# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.५/१/०७ रोजी तहकूब करण्यात आलेल्या व १६/१/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१९) इतिवृत्त**

**मंगळवार** दिनांक **१६ जानेवारी २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी १२.०० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गायकवाड दिलीप नारायण
3. सौ. दलाल लता श्रीनिवास
4. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
5. श्री. मुजीब आलमशाह खान
6. श्री. पांडे विनायक प्रभाकर
7. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
8. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
9. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
10. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
11. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
12. श्री. सावंत मधुकर दामोधर
13. श्री. मो. जावेद मो. इसाक
14. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : सिडको हस्तांतरण होवून १० महिने झाले. तेथील खूल्या जगा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आहे काय? असतील तर त्या जगेचे पजेशन घेतले का? तसेच त्या जगेवरील अतिक्रमण काढले किंवा काढणार आहोत काय?याचा खूलासा करावा.

शहर अभियंता : सिडकोतील ३९६ खूल्या जगा महापालिकेकडे आलेल्या आहे काही खूल्या जगेवर पूर्वीच मंदीर व इतर बांधकाम झालेले आहे ते प्रकरण तसेच प्रलंबीत आहे.

श्री.रविकांत गवळी : धार्मीक स्थळाच्या संदर्भात बोलत नाही. इतर ज्या खूल्या जगेवर अनधिकृतरित्या बांधकाम केलेले आहे ते काढलेले आहे काय? जर अतिक्रमण होते तर हस्तांतर करून घेतले कशासाठी. किती ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे त्याची नोंद प्रशासनाकडे आहे काय? गेल्या चार ते पाच बैठकीपासून मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे.

शहर अभियंता : या व्यतिरिक्त जी अतिक्रमणे झालेली असतील ते सिडको व महापालिकेने मिळून काढायचे आहे. किती जगेवर अतिक्रमण झालेले आहे याची नोंद सध्या उपलब्ध नाही. कॅसेट केलेली आहे त्यावरून किती ठिकाणी अतिक्रमण आहे हे लक्षात येते.

श्री.रविकांत गवळी : एन १३ मधील बालोद्यान सिडकोने केले आहे. त्यावर एका खाजगी व्यक्तीची मालकी आहे. तेथे त्यांचेकडेच त्या उद्यानाच्या कुलूपाची चावी असते. सिडकोने ते महापालिकेच्या ताब्यात दिले नाही काय? तेथे महापालिकेचा हक्क नाही का? सिडकोचे ते बालोद्यान असून कूणालाही जगा लिजवर दिलेली नाही.

मा. सभापती : जर ते बालोद्यान खाजगी व्यक्तीच्या ताब्यात असेल तर ते त्वरीत महापालिकेच्या ताब्यात घेण्याची संबधीत अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

श्री.मो.जवेद मो.इसाक : सिडकोतील काही मोकळया जगा हया वक्फ बोर्डची जगा आहे तिलाही ओपनस्पेसमध्ये घेण्याचा विचार होत आहे.

श्री.रविकांत गवळी : सिडकोने मुस्लीम कब्रस्तान म्हणून घोषित केले आहे त्यावरही अतिक्रमण झालेले आहे सिडकोकडून महानगरपालिकेने पजेशन घेतलेले आहे काय याचाही कूठे उल्लेख होत नाही.

मा. सभापती : शहर अभियंता यांना आदेशीत करतो की, ज्या सिडको भागातील मोकळया जगा आहे. त्या जगेचा महापालिकेच्या कर्मचाऱ्या मार्फत सर्वे करावा. त्या जगेचे पजेशन घ्यावे व जे ही अतिक्रमण असेल ते तात्काळ काढून तेथे महापालिकेच्या नावाचे फलक लावण्यात यावे. संरक्षित भिंत करावी ते शक्य झाले नाही तर तारकुपंन करण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तूपे : ज्या जगा हस्तांतर केल्या त्यातील काही जगा वक्फ बोर्डसाठी आरक्षीत आहे त्यास विकसीत करणार आहे का.

श्री.रविकांत गवळी : सिडकोकडून जगा हस्तांतर केल्या व वक्फ बोर्डने कागदपत्र दाखविल्यानंतर त्या जगेसंबधी काय निर्णय महापालिका घेणार आहे.

मा. आयुक्त : कोणत्या कागदपत्राच्या अधारे अधिकार दाखवत आहे हे तपासण्यात येईल तसेच एन १३ भागातील बालोद्यान संदर्भात पुढील दहा दिवसात संबधीत वक्फ बोर्डचे कार्यकारी अधिकारी तसेच सिडकोचे अधिकारी यांचेशी चर्चा करू.

श्री.रविकात गवळी : विषेश म्हणजेवक्फ बोर्डची जगेला संरक्षित भिंत करण्यासाठी महापालिकेने मंजूरी दिली परंतू तेथे अतिक्रमण झाल्यामुळे काम करता येत नाही.

सौ. लता दलाल : सिडकोने ज्या जगा महापालिकेकडे हस्तांतर केलेल्या आहे त्या जगेची सीडी महापालिकेकडे आहे. त्या बाबतीत प्रशासनाने शहानिशा करून सभागृहाला माहिती द्यावी.

श्री.दिलीप गायकवाड : मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे त्यासाठी एक पथक नियुक्त करावे.

श्री. साहेबराव कावडे : महापालिकेच्या मालकीच्या खुल्या जगा सध्या महापालिकेच्या ताब्यात आहे का, सदर जगेवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. चिकलठाणा येथील बाजराच्या जगेवर अतिक्रमण झाले. संरक्षित भिंत तेथील लोकांनी करू दिली नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे : वार्ड क्र. ९० एकनाथनगर भागात विद्यूत डि. पी. जवळ अपना गॅरेजच्या बाजूला १५×१५ ची टपरी टाकण्यात आलेली. या संदर्भात मी अनेक वेळा ही टपरी काढण्या संदर्भात प्रशासकीय अधिकारी यांना बोललो परंतू कार्यवाही केली नाही. त्याच रस्त्यावर अनेक अनधिकृत टपऱ्या झालेल्या आहेत. ये ज करण्यास अडथळा होतो रात्री वेळी त्या रस्त्यावर हातगाडया उभ्या असतात, लोकामध्ये वाद होतो हाणामारी झाल्या काही लोक जखमी झाले. यास प्रशासकीय अधिकारीच जबाबदार आहे. निदर्शनास आणून देवून सूध्दा कार्यवाही केलेली नाही. असा निष्काळजीपणा अधिकारी करीत असतील तर त्यांची त्वरीत त्या विभागातून बदली करण्यात यावी.

मा. सभापती : स.सदस्य श्री.हिम्मतराव दाभाडे यांनी केलेल्या सूचनेनूसार सदर ठिकाणचे अतिक्रमण त्वरीत हटविण्यात यावे.

श्री. विनायक पांडे : सिल्लेखाना येथेही मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे. वृत्तपत्रात आले. नेमके कूणाचे अतिक्रमण आहे. खूलासा घेण्यात यावा.

श्री.दिलीप गायकवाड : शहानुरमिया दर्गाच्या बाजूला मोबाईल टावर्स उभारण्यात येत आहे त्या संदर्भात महापालिकेची परवानगी घेतलेली आहे का?

मा. आयुक्त : सिल्लेखाना येथे ८० फुटाचा रस्ता आहे. १९८५ मध्ये त्या रस्त्याचे भूसंपादन केले होते. दोन्ही बाजूने ४०-४० फुट रस्ता एक आयलॅण्ड सोडून ज्या प्रमाणे नियम आहे त्याप्रमाणे भूसंपादन झालेले आहे. जे एम. झालेले आहे त्याप्रमाणे तेथे मार्कींग झालेली आहे जेएम.च्या प्रमाणे जगा भूसंपादीत केली होती ते क्लिअर करून पजेशन मध्ये घेत आहे.

सौ. लता दलाल : जे खूलासा केला तो समाधान कारक वाटत नाही. १९८९ ला श्री. सावे साहेब महापौर होते. आयुक्त म्हणून श्री. गौतम साहेब त्यावेळी रस्ता रूंदीकरणात या रस्त्याचा जे मोठा भाग येतो त्यामूळे या रस्त्याचा समोरचा व मागिल भाग कट करून ज्या ठिकाणी दर्गा आहे तो भाग व्यवस्थित राहू द्यावा असे ठरले होते. तसेच पूढे शिवाजे हायस्कूल व खोकडपूराकडून लक्ष्मण चावडीकडे जणारा हा रस्ता डाव्या बाजूला एक देवीचे मंदीर होते व त्या ठिकाणी दर्गा वगैरे काही नव्हता व आहे त्या ठिकाणी बांधकाम करावे व त्या रस्त्याच्या बाजूला असलेले मंदीरास लक्ष्मणचावडी येथे जगा द्यावी असा तो ठराव होता. हा संपूर्ण रस्ता झालेला होता रस्ता रूंदीकरण झालेले होते. सलग तीन दिवस सुट्टया आल्या त्या काळात या रस्त्यावर काम चालू होते. प्रशासकीय अधिकारी तसेच उपआयुक्त,महसूल यांना संपर्क साधला असता त्यांनी याची कोणतीही दखल घेतलेली नाही. वेळीच कार्यवाही केली नाही तर ते प्रशासनास नंतर त्रासदायक ठरते व नंतर वाद निर्माण होतो. काम सूरू असतांना वेळीच कार्यवाही केली तर योग्य होवू शकते. निदर्शनास आणून दिले असतांनाही का कार्यवाही झालेली नाही याचाही खूलासा करावा.

मा. आयुक्त : उपआयुक्त श्री. आनंदकर हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. या बाबतीत खूलासा असा की, या कामासंबधी सुट्टीच्या दिवशी माहिती माझ्याकडे आली होती मी प्रत्यक्ष जगेवर गेलो असता जेबांधकाम झाले त्यात किती जूने व नवीन किती हे समजून येत नाही. त्यांचे असे म्हणणे होते की फक्त प्लास्टर केले त्यासाठी सूध्दा महापालिकेची परवानगी लागते. त्या ठिकाणी ४०-४० फुटचा रस्ता सोडलेला होता जगेवर ३३ फूटच दिसत आहे. पूर्वी जेएम. झाले होते त्याप्रमाणे मार्कींग करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तेथील नागरीकांना तसे सांगण्यात आले आहे. दर्गाचा भाग सोडलेला होता. जे एम.चा १९८५ चा जे नकाशा आहे, दर्गाची जगा सोडली होती. दर्गाची जगा सोडून एक अंडाकार पध्दतीने तेथे मार्कींग करा तेवढे वगळून बाकी सर्व अतिक्रमण काढले जईल. रेकॉर्डवर दर्गाची जगा सोडलेली असून ते वगळता जे ८० फुटचा रस्ता आहे तो रूंद करणारच आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : एकनाथनगर भागातील अनधिकृत टपऱ्या संदर्भात खूलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी: एकनाथनगर भागात विद्युत डि. पी. च्या बाजूला एक टपरी आहे स. सदस्य यांनी सूचना केल्या प्रमाणे येत्या आठ दिवसात त्या बाबतीत कार्यवाही करण्यात येईल.

मा. सभापती : सभा संपल्यानंतर प्रशासकीय अधिकारी श्री. निकम यांनी स्थळपाहणी करावी व त्वरीत कार्यवाही करावी. तसेच शहानूरवाडी येथील होत असलेला टॉवर्स अनधिकृत आहे काय याचा खुलासा श्री.राठोड यांनी करावा.

सहा. संचालक(न.र.):शहानूरवाडी येथे नेमके कोणत्या सि. सर्वे मध्ये टावर्स होत आहे याची माहिती घेवून खूलासा करण्यात येईल.

मा. सभापती : या संबधी माहिती घेवून त्वरीत कार्यवाही करावी.

श्री. रविकांत गवळी : स. सदस्य वेळोवेळी सुचना मांडतात त्याचे गांभीर्य प्रशासन घेत नाही. मोबाईल टावर्स कंपनीच्या स्पर्धा वाढलेल्या असून वाटेल तेथे टावर्स उभारले जत आहे. त्यापासून नागरीकांच्या जिवितास धोका होवू शकतो. चूकीच्या पध्दतीने टॉवर्स उभारले जतात. असे होत असतांना प्रशासनास कुठे व किती टावर्स उभे झालेले आहे, होत आहे याची माहिती नाही हे बरोबर नाही. शहरात किती टावर्स आहेत याची कल्पना प्रशासनाकडे नाही.

श्री. हिम्मतराव दाभाडे : वारंवार प्रश्न सभागृहात उपस्थित होतो. गुन्हेगारास जर अधिकारी पाठीशी घालत असतील तर संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्री. दिलीप गायकवाड : मागिल बैठकीत अनधिकृत टावर्स तोडण्याची सूचना आपण दिलेली होती त्या बाबत कार्यवाही झालेली आहे का?

श्री.पुनमचंद बमणे : खामनदीवर मोठे अतिक्रमण झालेले आहे त्याठिकाणी मेन सिव्हर लाईन जते. त्यामूळे १० लक्षचे काम थांबलेले आहे. याबाबत केंव्हा कार्यवाही होणार आहे.

प्रशासकीय अधिकारी : या बाबत सहा. सचांलक नगररचना यांना पत्र देवून त्या ठिकाणी मार्कींग करून द्यावी म्हणून पत्र देवून कळविले आहे. तसेच नगर भूमापन कार्यालयास सूध्दा पत्र देवून तेथे मार्कींग करून द्यावी म्हणून कळविले आहे. ड्रेनेज विभागाने या संदर्भाने श्री. खोत पाटील या खाजगी एजन्सीला मार्कींग करून देण्यासाठी सर्वे करण्यासाठी एजन्सी नेमलेली आहे.

श्री. संजय सिरसाट : अधिकारी हे बेजबाबदारपणे उत्तर देतात. बीओटीवर खाजगी व्यक्तीला कामे देत आहे परंतू मार्कींगचे काम खाजगी एजन्सीला देता येते का?

कार्य.अभियंता(विद्यु व ड्रे.): हर्सूल ते मकईगेट हा भाग खामनदीचा मुख्य भाग आहे. गेल्या पावसाळयात मोठा पूर येवून पाणी आजूबाजूच्या लोकांच्या घरामध्ये गेले.त्यात जीवीत व वित्त हानी झाली. त्यामूळे स्थायी समितीने असा निर्णय घेतला, की खामनदीच्या बाजूला जे अतिक्रमण झालेले आहे त्याचे मार्कींग करायचे व दोन्ही बाजूला संरक्षित भिंत करून काही मालमत्तेचे संरक्षण करता येईल काय याची तपासणी करायची. स्थायी समितीच्या आदेशानूसार खोत पाटील असोशिएटस ही सर्वे करणारी एजन्सी आहे. या एजन्सीकडून सर्वेचे काम सूरू केले आहे. आताच उल्लेख केलेल्या भागाचे संपूर्ण सर्वेक्षण झालेले आहे. त्या संबधीचे नकाशे उपलब्ध करून घेतले आहे.लोकांच्या घरात पाणी जवू नये म्हणून नदीच्या बाजूला काम करण्यासाठी २३ कोटीचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

श्री. रविकांत गवळी : खाजगी एजन्सीला सर्वेचे काम का दिले त्याचे कारण असे की दोन वर्षापासून सर्वे करण्याची मागणी या सभागृहात होत होती व प्रत्येक वेळेस भूमिअभिलेख विभागाकडे तपशिल मागविला आहे पत्र दिले आहे असा खूलासा केला जत असे. खाजगी एजन्सीला सर्वेचे काम देवून ९ महिने झाले जे सर्वे झाला तो चूकीचा झालेला आहे. अतिक्रमण किती व नदीची पात्रची रूंदी कीती त्याचा उल्लेख नकाशामध्ये कोठेही नाही. त्यामूळे

अतिक्रमण नेमके झाले किती हे लक्षात येत नाही. तर ९ ते १० लक्ष सर्वेसाठी का खर्च करीत आहे.

कार्य.अभि.(विद्यु. व ड्रे ): तसा उल्लेख त्यात नाही ही वस्तूस्थिती आहे. सदर एजन्सीला तालुका भूमि अभिलेख यांचे कार्यालयात पाठविलेले होते. तेथेही रेकॉर्ड उपलब्ध नाही असे निदर्शनास आले.

मा. आयुक्त : नदीचे पात्राचे पूर्ण क्षेत्र किती आहे व नेमके कूठे पाणी साचते, काही ठिकाणी १० फुट असेल काही ठिकाणी ६० ते ७० फुट पात्र असेल. या संदर्भात नदीचे पात्र किती आहे याची दोन तीन महिण्यापासून तालुका भूमिअभिलेख विभागाकडून माहिती घेत आहोत ती मिळू शकली नाही. एजन्सीने पूर्ण नदीच्या पात्राचा सर्वे केलेला आहे त्या पात्राचे निश्चित लोकेशन किती आहे हे संबधीत विभागाकडेही माहिती नाही. नदीचे पात्र किती व त्याचे आत किती घरे आलेली आहे त्याची नोंद एजन्सीने केलेली आहे.

श्री.संजय सिरसाट : पावसाळयामध्ये अतिक्रमण झालेल्या घराची वित्त हानी किंवा जेवीत हानी होत असेल तर ते काढण्याचे अधिकार प्रशासनास आहे. नाल्याचे पात्र किती होते व किती असावयास पाहिजे नकाशा आहे किंवा नाही हा दुय्यम भाग होतो.

मा. आयुक्त : त्या जगेवर काय वस्तूस्थिती आहे हे रेकॉर्डवर आणणे गरजेचे आहे. ७.५ कि.मी. नाल्याची लांबी आहे. त्यात किती घरे आलेली आहे त्याचा सर्वे झालेला आहे. पाणी आजूबाजूला पसरणार नाही यासाठी उपाययोजना करायची आहे.

श्री.साहेबराव कावडे : पोट खराबी किती झालेली आहे याची मोजणी ही संबधीत कार्यालयाकडून घ्यावी लागेल. एजन्सी कोठूनही सर्वेचे काम सुरू करेल व पेमेन्टसाठी चूकीचा सर्वे सादर करील. पुर्वी नाल्याच्या बाजूला शेती होती, सर्वेनंबर रेकॉर्डवर असेल त्यानूसार नाल्याचे पात्र किती हे लक्षात येते.

श्री.रविकांत गवळी :पावसाळयात मोठया प्रमाणात नाल्यास पाणी आल्यावर जे अतिक्रमीत घरे आहे तेथे पाणी जते हे समोरच दिसते.एकूण १६५ घरे आहे. पावसाळा सूरू होण्यास ७ ते ८ महिने अवकाश असून येत्या १५-२० दिवसाच्या आत सदरील घरे काढून टाकावी. सर्वे होत राहील.

श्री.मोजवेद मो.इसाक: जे काम महापालिकेचे कर्मचारी करू शकतात अशी कामे खाजगी एजन्सीकडून का करून घेतली जत आहे.

मा. आयुक्त : मोजणी करण्यासाठी एकही कर्मचारी महापालिकेकडे नाही.

श्री.मधुकर सावंत : अनेक योजना ह्या बीओटीवर राबवित आहोत. मोजणी ही खाजगी एजन्सीमार्फत करणे हे बरोबर वाटत नसून महापालिकेची काही जबाबदारी आहे की नाही असा प्रश्न पडतो.

श्री.संजय सिरसाट : हा सर्व विषय थांबवावा. पावसाळयामध्ये काही हानी झाली तर प्रशासन त्यास जबाबदार राहील. अतिक्रमण अगोदर काढावे लोकांच्या घरात पाणी जते. सर्वे झाल्यानंतर नियमाने कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : कुठे अतिक्रमण झाले हे कळायला पाहिजेयासाठी सर्वे करण्याची गरजआहे. त्याशिवाय काढू शकत नाही महापालिकेकडे सर्वेसाठी कर्मचारी नाही.

श्री.मधुकरसावंत : अस्थापनेवर ५० कोटी रूपये खर्च होतो कर्मचारी काय काम करतात.

श्री.संजय सिरसाट : सिल्लेखाना भागापासून अतिक्रमणाच्या बाबतीत चर्चेला सुरूवात झाली. मागिल वेळेस अतिक्रमणाच्या संदर्भात एका नगरसेवकेला मारहाण झाली होती घाटी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले होते. तसेच एका कर्मचाऱ्यास मारहाणही झाली होती. या सभागृहात आणले गेले होते. इतर अतिक्रमणे काढण्यास प्रशासनाकडे कर्मचारी नसतात

परंतू एखाद्या ठिकाणी नगरसेवक मध्यस्ती करायला गेले तर त्यांना नोटीस देण्यास पाच मिनिट लागतात. अशा प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आपण आदेशीत करावे. कोकणवाडी भागात महानगरपालिकेच्या खुल्या जगेवर अतिक्रमण झाले अनेक वेळा त्या बाबतीत सुचना केल्या परंतू कार्यवाही होत नाही. नाल्यात लोकांची घरे झालेली आहे त्या घरामूळे पाणी अडते व इतर लोकांच्या घरात पाणी जते व सर्वेसाठी ९ महिने लागत असतील तर यासारखे दुर्दैव नाही.

मा. सभापती : सभागृहाच्या भावना लक्षात घेता खामनदी असेल किंवा इतर अतिक्रमण असेल जेप्रथम दर्शनी निदर्शनास येते ते काढण्यासाठी मोजणी किंवा नकाशाची गरज नाही. आजही खामनदीवर अतिक्रमण आहे त्याची मोजणी करण्याची गरजनाही. सदर अतिक्रमण त्वरीत काढण्यात यावे तसेच इतरही अतिक्रमणे १५ दिवसाच्या आत क्लिअर करावे अशा सूचना देण्यात येत आहेत. तसेच स.सदस्य श्री. बमणे यांनी सुचना मांडल्यानूसार जे सिव्हर लाईनवर अतिक्रमण झालेले आहे ते त्वरीत काढण्याची कार्यवाही करावी.

श्री.साहेबराव कावडे : खामनदीचे पात्र नेमके किती आहे जगा माहित नाही असे असतांना कशासाठी खर्च केला जत आहे.

मा. आयुक्त : खामनदीला दरवर्षी पावसामूळे पूर येतो. लोकांच्या घरात पाणी जते अल हिलाल कॉलनीमध्ये प्रत्येक वेळी लोकांना बाहेर काढावे लागते. जे पर्यत सर्वे होत नाही तोपर्यत किती घरे नदीच्या पात्रात आलेली आहे हे कळणार नाही. ६ ते ७ कि.मी. सर्वे करण्यासाठी ३ वर्ष लागले असते परंतू खाजगी एजन्सीकडून सर्वे केल्यास कमी वेळेत होईल म्हणून करण्यात आलेला आहे. सर्वे करण्यासाठी महानगरपालिकेकडे कर्मचारी नाही. या सर्वेमध्ये डिटेल जे बांधकाम झालेले आहे त्याचा १०० टक्के सर्वे झालेला आहे. त्यानंतर संरक्षित भिंत कोठून बांधावी लागेल त्यासाठी अंदाजपत्रक पूर्ण केले. कालच या संबधीची संचिका सर्वसाधारण सभेपूढे मजूरीसाठी ठेवलेली आहे. जेपर्यंत सर्वे होणार नाही तोपर्यत कोणते घर नदीच्या पात्रात आलेले आहे हे कळणार नाही. जेआलेले आहे ते तोडण्याची कार्यवाही तात्काळ प्रशासन सूरू करणार आहे. शासनाकडून जे ५.५० कोटी मिळाले होते त्यातून ड्रेनेजसाठी १.५० कोटी वळती केले जेकी दोन तीन वस्त्यामध्ये दरवर्षी पावसाचे पाणी जते त्यामूळे तेथील लाईन बदलून घ्यायच्या आहे. जे सर्वे केलेला आहे तो योग्य आहे. मी स्वत: नकाशा बघीतला काही घरे प्रथमदर्शनीच अनधिकृत पात्रात येते हे दिसते. त्यामूळे ते काढण्याची कार्यवाही करू. मा. सभापती यांनी तसे आदेशीत केलेले आहे. १५ दिवसात कार्यवाही सुरू करू. तसेच सर्वसाधारण सभेची मान्यता झाल्यानंतर सरंक्षित भिंतीचे कामही सूरू करण्यात येईल.

श्री. दिलीप गायकवाड : मा. आयुक्ताचे स्विय सहाय्यक हे पद गेल्या तीन वर्षापासून रिक्त आहे. सदर पद भरण्याची प्रशासनास आवश्यकता भासत नाही का, तसेच मुख्य लेखा परीक्षक हे पद सूध्दा रिक्त आहे.

मा. आयुक्त : माझे कार्यालयात जे कर्मचारी वर्ग आहे तो पुरेसा आहे. सध्या हे पद भरण्याची आवश्यकता भासत नाही. मुख्य लेखा परीक्षक पदाच्या संदर्भात शासनाकडे पाठवून कार्यवाही करण्यात येईल.

श्री. हिम्मतराव दाभाडे : महापालिकेचे सुरक्षा रक्षक यांना तीन वर्षापासून कपडे शिलाई दिलेली नाही. तसेच ज्या कर्मचाऱ्याना सेवेत कायम घेतले त्यांचे आतापर्यत सेवापटात नोंद झालेली नाही.

प्र.मुख्यलेखाधिकारी : मंजूरी मिळालेली आहे. या वर्षाची शिलाई राहिलेली आहे.

मा. सभापती : शिलाईचा खर्च त्वरीत देण्यात यावा. ज्या कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक भरलेले नाही त्या संबधी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

डॉ. आशा बिनवडे : यापूर्वी विषय चर्चेला आला होता जे लाईनमन तसेच सब ओव्हरसिअर आहेत त्यांना मोबाईल सेवा देण्यात यावे म्हणून निर्णय झालेला होता अद्याप कार्यवाही झाली नाही.

मा. सभापती : पाणीपूरवठा व विद्यूत विभागातील जे कर्मचारी यांना नागरीकाशी तसेच स. सदस्यांशी नियमीत संपर्क करावा लागतो अशा कर्मचाऱ्याना मोबाईल सेवा उपलब्ध करून द्यावी.

शहर अभियंता : स्थायी समितीने १० लक्षपर्यतचे एक वर्षाचे मोबाईल बील मंजूर केलेले होते. त्यानूसार १० लक्ष पर्यतचे बीएसएनएलचे मोबाईल देण्यात आले होते. आयडीया मोबाईल कंपनीने चांगला प्लॅन दिला त्यानूसार १०५ ऐवजे आता १४० अधिकारी कर्मचारी यांना मोबाईल देता येईल. यात १० लक्ष वर्षाकाठी खर्च होईल. जे ३५ संख्या वाढली त्यात काही अधिकारी यांना दिलेले नव्हते त्यांचा समावेश केलेला आहे. यापूढे जर द्यायचे असेल तर तो खर्च वेगळा पडेल त्यास स्थायी समितीची मंजूरी लागेल.

सौ. लता दलाल : ज्या अधिकाऱ्यांशी नगरसेवकांचा केव्हाही संपर्क येत नाही अशा अधिकाऱ्याना मोबाईल दिले. काही अधिकारी स्वत:चा मोबाईल घेवू शकतात अशांना दिले त्यांचे कमी करून ज्यांना आवश्यक आहे त्यांना देण्यात यावे.

मा. सभापती : १० लक्षच्या खर्चातच ज्या अधिकाऱ्याना मोबाईलची आवश्यकता नाही त्यांचे मोबाईल आवश्यक कर्मचारी, जे की पाणीपूरवठा व विद्यूत विभागातील कर्मचारी यांना देण्यात यावे अगोदर या कर्मचाऱ्याना प्राधान्य देण्यात यावे.

सौ. लता दलाल : या शहरात किती लहान मोठे हॉटेल्स आहेत. अग्निशमन दलाची किती लोकांनी एनओसी घेतलेली आहे. ज्यावेळी कांचनवाडी येथे गॅस स्फोट प्रकरणामूळे जी हानी झाली होती तेव्हापासून हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. आरोग्य विभागाने माहिती घेतलेली आहे काय?

वैद्यकीय अधिकारी : या बाबतीत माहिती घेवून दिली जईल.

मा. सभापती : पूढील बैठकीत आरोग्य वैद्य.अधिकारी यांनी या बाबतीत माहिती देण्याची व्यवस्था करावी.

डॉ. आशा बिनवडे : महानगरपालिकेचा बायोमेडीकल वेस्ट हा प्रकल्प खाजगी संस्थेद्वारे चालविला जतो. शहरातील डॉक्टर्स सभासद आहेत. कचरा कसा गोळा केला जतो. तक्रारी काय आहेत याचा आढावा घेण्याची गरज आहे. तक्रारी नोंदविण्यासाठी रजिस्टर आहे परंतू तक्रारीचे निराकरण होत नाही. १३ तारखेला डॉक्टरला या संस्थेचे पगारे नावाचे वसूली अधिकारी यांनी फोनवरून अत्यंत वाईट शिव्या, मारण्याच्या धमक्या दिल्या, आमची लोक पाठवतो लगेच थकबाकी देण्याची धमकी दिली. त्या संबधीचे पत्र मला प्राप्त झाले आहे. त्याची एक प्रत मा. सभापती यांचेकडेही देण्यासाठी दिलेली आहे ती आपल्याकडे सादर करीत आहे. संबधीत डॉक्टर यांनी मुकूदंवाडी येथे पोलीस स्टेशनला या संदर्भात तक्रारही केलेली आहे, वसूली करतांना खाजगी एजन्सीच्या व्यक्तीकडून अशा घटना होत असतील तर त्या एजन्सीकडे काम ठेवायचे की नाही याचा विचार केला पाहिजेव सदरील डॉक्टरांचे म्हणणे ऐकूण घेतले पाहिजे बायोमेडीकल डिस्पोजल करणे हे बंधनकारक असले तरी त्या डॉक्टरांनी महापालिकेच्या प्रकल्पाचे सभासद होणे बंधनकारक नाही. सभासद झाले तरी जेंव्हापासून सभासद होणे आवश्यक होते त्या दिवसापासून चार्जेस न लावता जेव्हापासून सेवा देत आहोत त्या दिवसापासून चार्जेस

लावावे. ते बंद झाले पाहिजे या प्रकरणाची चौकशी करावी. रिव्हयू घेतला पाहिजेव पून्हा त्या ठेकेदारास काम द्यायचे की नाही याचा अहवाल आल्यानंतर पूढील ठेका देण्याचा निर्णय घेण्यात यावा.

मा. सभापती : या संदर्भात मा. आयुक्त या प्रकरणाची चौकशी करतील व योग्य ती कार्यवाही करतील.

श्री. विनायक पांडे : सामना वृत्तपत्रात जमा मस्जीदला महानगरपालिकेचा विद्युत पूरवठा केला जतो असे आले हे सत्य आहे का?

कार्य.अभि.(विद्यु.वड्रे.):हायमस्ट उजेड कदाचित मस्जीदच्या मैदानात पडत असेल परंतू मस्जीदसाठी विद्युत पूरवठा केला जत नाही. रस्त्यावरही उजेड पडतो. ज्यावेळी हायमस्ट बसविला त्यावेळी ती महापालिकेचीच जगा होती आताचे स्टेटस् काय आहे मला माहित नाही.

श्री.विनायक पांडे : महापालिकेची जगा आहे की अतिक्रमण केले याचा खूलासा करावा.

सहा.संचालक(न.र.) : जमा मस्जीदच्या ठिकाणी बांधकाम परवानगी दिलेली आहे. सदरील नकाशा व जगेवर परीस्थिती तपासून अहवाल देण्यात येईल.

श्री.मिलींद दाभाडे : मागिल बैठकीत मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्याचे कामात मोठा भ्रष्टाचार झालेला होता म्हणून सूचना मांडली होती. मा.सभापती व मा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष त्या ठिकाणी पाहणीही केली होती. त्यासंबधी काय कार्यवाही केली. कार्यवाही होत नसेल तर उपोषण करावे लागेल.

मा. सभापती : मा.आयुक्त या प्रकरणाची चौकशी करीत आहेत, १५ दिवसात चौकशी पूर्ण झाल्यानंतर अहवाल सभागृहासमोर येईल.

श्री.मो.जवेद मो.इसाक : शिवाई ट्रस्टने औरंगपूरा येथील नाल्यावर नियमाने बांधकाम केलेले नाही, खूलासा करण्यात यावा.

सहा. संचालक(न.र.): या बाबतीत प्रकरण उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.दिलीप गायकवाड : नगरसचिव पद हे कोणत्या जती जमातीसाठी राखीव आहे.

सहा.आयुक्त-१ : नगरसचिव हे पद खुल्या संवर्गासाठी आहे.

श्री.संजय सिरसाट : जेव्हा हायमस्ट लावण्याचे टेंडर काढले तेंव्हा ती जगा वेगळी होती. त्यावेळी तत्कालीन आयुक्त म्हणून श्री. शर्मा साहेब होते. तो बसवितांना त्यांचे नियम असतात की तो चौकात असावयास पाहिजेसर्व बाजूने प्रकाश पडला पाहिजे जेथे हायमस्ट लावला गेला ती हायमस्ट लावण्याची मुळात जगाच नाही.चुकीच्या ठिकाणी लावण्यात आलेला आहे. हायमस्ट शिफ्ट करून जमा मस्जीदच्या बाजूला ज्या ठिकाणी महापालिकेची खुली जगा होती अशा ठिकाणी लावण्यात येवून व बाजूला संरक्षित भिंत अशा पध्दतीने करण्यात आली की हायमस्टचा व महानगरपालिकेचा काही संबध नाही. जे सरंक्षित भिंत केली ती महापालिकेच्या खर्चाने केलेली आहे व ती काढून टाकण्यात येईल असे तत्कालीन आयुक्त यांनी आश्वासन दिले होते. संबधीत ठेकेदाराचे बिल थांबविण्यात आले होते परंतू त्यावेळी जे उपअभियंता होते त्यांनी जबाबदारी घेतली मी बील देण्याची हमी देतो हायमस्ट बसवावा म्हणून. या संदर्भात चौकशी चालू होती व त्यावेळी असे सांगण्यात आले की बाजूलाच दुसरी महापालिकेची खुली जगा आहे तेथे हिरवळ आहे त्या ठिकाणी हा हायमस्ट लावण्यात यावा. ज्या ठिकाणी मुळ मंजूरी होती तेथे. म्हणून हा हायमस्ट त्वरीत काढून तो मध्यवर्ती ठिकाणी बाजूलाच असलेल्या महापालिकेच्या खुल्या जगेत लावण्यात यावा.

मा. सभापती : या संदर्भात कार्य. अभियंता श्री. पानझडे यांनी त्वरीत पाहणी करून नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री.संजय सिरसाट : जकात खाजगीकरणाची कार्यवाही चालू आहे. काही नगरसेवक एजन्सीशी चर्चा करण्यासाठी मुबंईला गेले म्हणून वृत्तपत्रात आले. अशा बातम्या कशा व का येतात हा भाग वेगळा असला तरी खाजगीकरण करतांना शासनाने नॉर्मस् दिलेले आहेत. मागिल वर्षी जकात खाजगीकरण करण्यात आले, १०१.२५ कोटीमध्ये टेंडर गेले. शासनाने जे नियम दिले आहे त्या बाहेर जवून आपल्याला निर्णय घेता येत नाही. मागिल वर्षी पेक्षा दुसरे वर्षी टेंडर काढायचे असेल तर नैसर्गीक वाढ व इतर वाढ गृहीत धरून १५ टक्केपर्यंत वाढ झाली पाहिजे याचाच अर्थ ११८ कोटी पर्यत टेंडर जणे आवश्यक होते. जे टेंडर काढले ते ११८ ते १२० कोटी पर्यंतचे का काढलेले नाही. वृत्तपत्राच्या माध्यमातून अनेक खुलासे आपण वाचलेले आहेत. तसेच टेंडर काढले त्यात अटी व शर्ती सुध्दा वेगवेगळया ठेवलेल्या आहे. उदाहरण घ्यावयाचे झाल्यास त्या अटीमध्ये असे नमूद आहे की सदर एजन्सीला ५६ कोटीची वसूली केल्याचा अनुभव असला पाहिजे हे बाजूला ठेवून ११८ ते १२० कोटीचे टेंडर न काढण्या मागे कारण काय याचा खूलासा प्रशासनाकडून घेण्यात यावा.

मा. आयुक्त : महानगरपालिकेसाठी शासनाचे कोणतेही नियम नाही. नगरपालिकेसाठी पूर्वीचा एक जी. आर. होता. त्यानुसार कोणत्याही नगरपालिकेने प्रथम वर्षी जकात खाजगीकरण केले व वसूली केलेल्या रक्कमेच्या २० टक्के रक्कम वाढवून पूढील वर्षी तसे टेंडर काढावयास पाहिजे त्यानंतर प्रत्येक वर्षी १० टक्केने वाढ करावी. हे निमय महानगरपालिकेसाठी नसले तरी त्याचा आधार महापालिकेसाठी घेण्यास हरकत नाही. १० टक्के नैसर्गीक वाढ झाली पाहिजे असे प्रशासनास वाटते. मागिल वर्षी जकात खाजगीकरण केले त्यात १०१.२५ कोटी मिळतील २८ फेब्रुवारी पर्यत वसूल होतील. या वर्षी शहरातील काही कंपन्याचे जसे गरवारे कंपनीचा एक प्लॅन्ट बंद झालेले आहे. त्याबाबतीत चर्चाही झालेली होती ज्यामुळे महानगरपालिकेचे २.५० कोटी ते ३.०० कोटी चे उत्पन्न कमी होणार आहे. ते प्लॅन्ट परत सूरू होणार नाही याचीही माहिती घेतलेली आहे. त्यामुळे वरील प्रमाणे जकात कमी येणार आहे. रॉ मटेरीयलवर रीकव्हरी मिळत होती. तेंव्हा गोडाऊन वाळूजमध्ये होते. येथे जकात मिळत होती. नंतर वाळूजमध्ये जवून शहरामध्ये जे कन्झम्शन आहे त्याची रिकव्हरी परत येत होती. एक दिवसाला जवळपास १.०० लक्ष जकात मिळत असेल त्यामुळे जवळपास ३.५० ते ४ कोटीचे नूकसान झालेले आहे. हे वज करून १०१.२५ कोटीवर १० टक्केनी वाढ केली असे १०३ कोटी झाले. रहदारी फिस ५० रू. ऐवजे आपल्या मान्यतेने १०० रूपये करण्यात आले त्यामूळे ४.५० कोटी शासनाने मंजूरी दिल्यावर मिळण्याची शक्यता आहे. असे मिळून १०९ कोटीचे टेंडर काढलेले आहे. जेउद्दीष्ट दिले आहे त्याचे ५० टक्के रक्कम वसूली करण्याचा अनुभव पाहिजे अशी अट होती या संदर्भात न्यायालयात सुध्दा प्रकरण गेले होते व ते प्रकरण न्यायालयाने खारीजकेले. ज्या अटी शर्ती टाकलेल्या होत्या त्यास कायम केलेले आहे आज शेवटचा दिवस होता.त्यानंतर स्थायी समितीच्या मंजूरीसाठी येईल.

श्री.संजय सिरसाट : कंपनी चालू राहिल किंवा बंद पडेल हा विषय प्रशासनाचा नाही. सध्या काही कंपनीचे बांधकाम चालू आहे आणखी कंपन्या स्थायीक होवू शकतील ते उत्पन्न कसे ग्राहय

धरणार आहे. शासनाची कोणतीही नियमावली नाही. खाजगीकरण करतांना महानगरपालिकेचा होणारा फायदा जस्त झाला पाहिजे यासाठी नगरपालिकेच्या नियमावलीचा आधार घेतला. मागिल वेळेस सिमेंट व स्टीलचे रेट काय होते. आज वाढ झालेली दिसून येते. असे असतांना जकातीचे उत्पन्न कमी होईल म्हणून गृहीत धरणे बरोबर नाही. शासनाचे नियमाचे पालन केले नाही. ११८ कोटीचे टेंडर काढण्यास काय हरकत होती. जे टेंडर आले असते स्थायी समिती समोर किंवा ते रद्द करण्याचे अधिकार प्रशासनास होते. स्थायी समिती समोर तसा प्रस्ताव यायला पाहिजे होता. मा.न्यायालयाने असा निर्णय दिला की हा अधिकार महानगरपालिकेचा आहे. परंतू पॉलीसी ठरवितांना तो अधिकार महानगरपालिकेला आहे. चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत नवीन कंपन्या येत आहे. उत्पन्न येवू नये विकास कामे होवू नये म्हणून जणूनबूजून हे उद्दिष्ट कमी ठेवले असा माझा आरोप आहे. नगरपालिकेचे नियम गृहीत धरून केले. ११८ ते १२० कोटीचे टेंडर का काढले नाही हा बेसीक प्रश्न माझा आहे. प्रत्येक कंपनी मालक म्हणेल की कंपनी शिफ्ट होत आहे. त्यांचे ऐकत गेलो तर उद्दिष्ट कमी होवून महानगरपालिकेने नूकसान होवून जे जकात वसूलीचा ठेका घेईल त्याचा फायदा होईल. महापालिकेला उत्पन्न आले नाही तर जनतेला ज्या सुविधा मिळावयास पाहिजे त्या देता येणार नाही. ठेकेदाराच्या फायद्यासाठी महापालिका चालवित नाही. म्हणून ११८ कोटीचे टेंडर का काढले नाही हा माझा प्रश्न आहे.

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी खूलासा करावा.

मा. आयुक्त : शहराची वस्तूस्थिती विचारात घेवून तसेच जकात कमी होण्याचे चांन्सेस आहे, त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. शासनाचे महापालिकेसाठी नियम नसले तरी नियमानुसार १० टक्केनी वाढ करून त्यात आणखी ५ कोटीची वाढ केलेली आहे.१०१.२५ कोटीचे बजेट गेल्या वेळेस होते जी जकात कमी होणार आहे ती वज केल्यास ९३ कोटी असे येवून त्यावर १० टक्केनी वाढ करून व इतर ५ ते ६ कोटी समावेश करून १०९ कोटीचे टारगेट ठेवलेले आहे.

श्री. संजय सिरसाट : जर ही कंपनी सहा महिण्यापूर्वी बंद झाली असेल तर ठेकेदारास पैसे परत करावे. संबधीत ठेकेदाराने मागिल वेळी निवेदन दिले की चार दिवस हे शहर बंद होते संचारबंदी लागलेली होती माझे नुकसान झालेले आहे ती रक्कम महानगरपालिकेने त्यास दिली का? नाही कारण एकदा करार झाल्यानंतर जी रक्कम ठरविलेली आहे ती वसूल करून घेणार.

मा. आयुक्त : सबंधीत ठेकेदार यांनी त्यावेळी पत्र दिले होते परंतू करारनाम्यानुसार ते बरोबर न दिसल्याने त्याच क्षणी रद्द केले. परंतू पुढील वर्षी अंदाजपत्रक तयार करतांना या शहराची वस्तुस्थिती विचारात घेवून करावे लागते. जे टेंडर भरून येईल ते प्रशासनास समाधानकारक वाटले तर स्थायी समितीच्या मंजूरीसाठी येणार आहे. त्यास मंजूरी द्यायची की नाही हा सभागृहाचा अधिकार आहे.

श्री.संजय सिरसाट : एखादी कंपनी बंद होते व अंदाजपत्रक कमी केले जते संबधीत कंपनीने प्रशासनाकडे तसे पत्र दिलेले आहे का याचाही खूलासा करावा.

मा. आयुक्त : प्रशासनाने अधिकृत माहिती घेतलेली आहे.

श्री.मो.जवेद मो.इसाक : कंपन्या बंद होतील किंवा आणखी नवीन चालू होतील. ते ग्रहीत धरून उद्दिष्ट कमी करणे बरोबर नाही.

मा. आयुक्त : प्रशासनाने एक अंदाजबांधलेला आहे त्यानुसार टारगेट ठरविलेले आहे. १०९ कोटीचे टेंडर आले सभागृहाला कमी वाटत असेल तर मान्य करू नये.

श्री.मधुकर सावंत :विषयपत्रिकेवर ५ लक्षचे अंदाजपत्रक मंजूरीसाठी ठेवले. जकात खाजगीकरणाचे एवढे मोठे अंदाजपत्रक असतांना या सभागृहाच्या मान्यतेसाठी का ठेवलेले नाही.

मा. आयुक्त : नियमात असे दिले की आयुक्तांना जर योग्य वाटत असेल तर खाजगी अभिकर्त्या मार्फत जकात वसूली करू शकतात. परंतू त्यानंतर स्थायी समितीची सम्मती घ्यावयास पाहिजे. जकात वसुली ठेकाराचे टेंडर मागवितो नंतर स्थायी समितीसमोर येतील. मंजूर करायचे की नाही हे सभागृहाने ठरवावे.

श्री.संजय सिरसाट : मागिल वेळेस १०९ कोटीचे टेंडर काढले, नंतर १०४ कोटीचे काढले, १०१.२५ कोटीत आयुक्तांना वाटले म्हणून देवून टाकले. १०९ कोटीचे अंदाज ठेवला स्थायी समितीने मंजूर केले नाही व १०८ कोटीची वसूली झाली तर १ कोटीसाठी स्थायी समितीवर प्रशासन कार्यवाही करण्यास मागेपुढे पाहणार नाही.

मा. आयुक्त : मागिल वर्षी जे टेंडर आले ते सभागृहाला ही मान्य झाले व प्रशासनानेही मान्य केले म्हणून ठेका दिला. आता प्रशासनास योग्य वाटेल तर स्थायी समितीकडे येईल स्थायी समितीला योग्य वाटले तर मान्य करावे नसता करू नये.

श्री.संजय सिरसाट : अंदाज बांधणे चुकीचे आहे यात महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. ५६ कोटी वसूली करण्याचा अनुभव पाहिजेही अट टाकणे योग्य वाटत नाही. कारण ५६ कोटीच्या आसपास अनेक महापालिकेचे उद्दीष्ठ आहे. ५६ कोटीचा अनुभव असलेली दुसरी एजन्सीच असू शकत नाही. ही अट जणूनबूजून टाकलेली आहे हा माझा आरोप आहे.

मा. आयुक्त : ५० टक्के टारगेटच्या वसूलीचा अनुभव असावयास पाहिजे नसता कुणीही टेंडर भरतील व वसूली करणार नाही. मागिल वर्षी अनुभव आला .

श्री. मधुकर सावंत : ज्या ठेकेदारास वसूलीचा अनुभव आला त्यांचे पुढील व्यवस्था करून ठेवली असे वाटते. गेल्या वर्षी ही अट नव्हती या वेळेस टाकली याचा अर्थ असा की सदर एजन्सीलाच ठेका देण्यासाठी ही व्यवस्था केली असा माझा आरोप आहे.

श्री.संजय सिरसाट : या वरून अंदाज येतो की जे ११८ कोटीचे टेंडर काढावयास पाहिजे ते १०९ कोटीचे काढण्यात आले. कागदपत्रावरून दिसून येते. ५६ कोटीची वसूली करण्याचा अनुभव पाहिजे ही अट कशासाठी टाकली त्यांचाही अंदाजदिसून येतो. यावरून सहकार एजन्सीच हे टेंडर घेणार आहे असे दिसून येते.

मा.सभापती : जकात खाजगीकरणाचा विषय स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय मान्य होणार नाही तसा प्रस्ताव आल्यानंतर त्यावर विचार विनिमय करून योग्य तो निर्णय घेवू.

श्री. रविकांत गवळी : यापूर्वी जकात वसूली महापालिकेच्या मार्फत होत होती गेल्या वर्षी जकात वसूली ही खाजगी अभिकर्त्यामार्फत केली शासनाकडून जस्तीत जस्त निधी उपलब्ध करून घ्यायचा आहे त्यासाठी खाजगीकरण करायचे असे सांगण्यात येत होते. जकात खाजगीकरण केले परंतू सदर ठेकेदार यांनी सामान्य जनतेची व व्यापाऱ्यांची मोठी पिळवणूक केलेली आहे. काहीचे हाफ मर्डर केले आहे. नारेगाव नाक्यावर एक व्यक्तीचे दोन पाय कापले होते. सर्व अनुचीत प्रकार करून या एजन्सीने १०१ कोटीची वसूली करून महापालिकेस दिली. महानगरपालिकेने सुध्दा उद्दीष्ट पूर्ती केलेली होती. महानगरपालिकेनेच आता वसूली करावी. खाजगीकरण करू नये. खाजगी एजन्सीकडून

वसूली करायची की महापालिकेने करायची या निर्णयासाठी सर्वसाधारण सभेकडे हा विषय येणे आवश्यक होते.

मा. आयुक्त : कायद्यामध्ये स्पष्ट दिले आहे की आयुक्तांना योग्य वाटत असेल तर स्थायी समितीच्या सम्मतीने जकात वसूली खाजगी अभिकर्त्यामार्फत करू शकतो.

श्री.रविकांत गवळी :जकात वसूली करतांना शहरातील सामान्य नागारीकांना त्रास होवू नये याची दखल घेण्यात यावी.

मा.आयुक्त : जेव्हा स्थायी समितीसमोर हा विषय येईल तेंव्हा माहिती देणारच आहे. तरी सुध्दा माहितीसाठी खुलासा करतो, की दरम्यानच्या काळात जेंव्हाही जकात रद्द झाली तर एक महिण्यापूर्वी रद्द झाले व एक महिण्यानंतरची तारीख मिळाली तर एक महिण्यात कुणीही माल आणणार नाही. असे झाले तर शेवटच्या महिण्याचे जेकलेक्शन आहे ते कमीशन ते चेक करतील. जर एक महिण्याचा डिफरन्स असेल तर काही नाही आजच रद्द केला तर त्याचा लिगल मुद्या निघू नये म्हणून अट टाकलेली आहे.

श्री.रविकांत गवळी :खाजगी अभिकर्ता जनतेची पिळवणूक करून वसूली करीत असेल तर महानगरपालिकेनेच वसूली करावे.

श्री.साहेबराव कावडे : घरकूल योजनेचे घरे बांधून देणार होते. आतापर्यत काय कार्यवाही केलेली आहे.

मा. आयुक्त : या वर्षी स्कीम बंद झालेली आहे. परंतू महापालिकेने अगोदरच कार्यवाही केलेली होती म्हणून प्रपोजल महाराष्ट्र शासनाकडून मान्य झालेले आहे व केंद्र शासनाकडे गेलेले आहे. संबधीत अधिकारी त्याच कामासाठी गेलेले आहे. ७ ते ८ दिवसात प्रपोजल मान्य होवून येणार ८० हजराचे घर आहे. खुल्या संवर्गातील असेल तर १२ टक्के रक्कम त्यांनी द्यायचे, एस.सी., एस.टी. उमेदवार असतील तर त्यांना १० टक्केच द्यावे लागणार आहे. उर्वरीत सर्व केंद्र शासनाकडून येत आहे. घर व घराचे समोरील रस्ते वगैरे त्याचे अंदाजपत्रकही पाठविलेले आहे. १२ कोटीमध्ये आहे. १०० टक्के रक्कम केंद्र शासनाची आहे. पुढील दहा दिवसात १२ कोटीचे प्रपोजल शासनाकडून मान्य होवून त्यानंतर पुन्हा ६ भागाचे सर्वेक्षण केले जईल त्यापैकी ४ भागाचा सर्वे झालेला आहे. त्या बाबतीत कार्यवाही होईल.

श्री. मधुकर सावंत : माझावार्ड १०० टक्के स्लम आहे. तीन चार वर्षापासून मी पाठपुरावा करीत आहे. या योजनेमध्ये समावेश करण्यात यावा.

सौ. लता दलाल : सर्वच वार्डात दुर्बल घटकातील लोक आहेत त्यांचेसाठी ही योजना नाही काय.

मा. आयुक्त : स्लम डिक्लेर असण्याची गरजनाही. एक घर एका ठिकाणी, दुसरे दुसरीकडे अशी ही योजना राबविता येणार नाही. मेजॅरीटी ज्या भागात जस्त आहे त्यांना एकत्रित करून ही घरे द्यायची आहेत तसेच इतर सुविधाही दिल्या जतील. याचा खर्च शासन देणार आहे. २५ टक्के असेल तर करता येईल.

सौ. लता दलाल : कामगार अधिकारी नेहमी सभेला उपस्थित नसतात.

मा. सभापती : यापुढे प्रत्येक बैठकीला कामगार अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

श्री.दिलीप गायकवाड : मयूरनगर हडको भागात भाजी मार्केटला भेट दिली होती. ४०० ते ५०० लोक तेथे बसतात. त्यांना कायमस्वरूपी बसण्याची व्यवस्था होईल काय? तसेच मटन मार्केट धारक यांना कायमस्वरूपी जगा देण्याचे आश्वासन दिलेले आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : माझ्या वार्डात लाईट लावण्याचे काम जी एजन्सी करीत आहे, आतापर्यंत तीन वेळा लाईट लावलेले आहे. यामुळे जणारे येणारे लोकांच्या अंगावर पडू शकतात असे काम करणार असेल तर कार्यवाही करावी.

मा. सभापती : संबधीत अधिकारी यांनी पाहणी करून कार्यवाही करावी.

**विषय क्र.188 :** {दि.16-12-2006 च्या सभेतील विषय क्र.175}

दिनांक **24/11/2006** (का.प.क्र.15) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

डॉ. आशा बिनवडे : हा विषय दिनांक १६.१२.२००६ च्या सभेतील असून ऐनवेळचा विषय होता. त्या बाबतीत मी प्रश्न विचारलेले होते त्याची उत्त्तरे पण मिळालेली आहे. प्रस्ताव अगोदर जरी ठेवला व नंतर जरी ठेवला तो पटलावर घेण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे. सदर प्रस्ताव लवकर काम करावे म्हणून सदर विभागाने ठेवलेला होता. मुं. प्रां. महानगरपालिका अधि. १९४९ चे प्रकरण २ चे अवलंब केला तर असे लक्षात येईल की जे विषय विषयपत्रिकेवर नसतो, पुरवणी विषय पत्रिकेवर नसतो, ऐनवेळी प्रशासनाचा विषय ठेवायचा असेल तर तो सभागृहातील तीन चर्तुथांश सदस्यांची अनुमती पाहिजे, की तो विषय चर्चेला घ्यायचा किंवा नाही. अनुमती न घेता हे विषय मंजूर करण्यात आले होते. १६९, १७० क्रमांकाचे विषय आहेत. या अधिनियमाचे आणखी दोन नियम सुध्दा डावलले आहे. मुं.प्रां.महानगरपालिका अधि.१९४९ चे ७२ अ अधिकाराचा वापर करणे हे महानगरपालिकेने आवश्यक खर्चास मंजूरी देणे अधिन असणे , ८६ (१) नगरपालिका निधीतून खर्च करणेस निर्बंध हे दोन्ही नियम डावलून हे विषय या सभागृहात आलेले होते. ते दोन्ही विषय नामंजूर आहे. ते रद्द करावेत. नियमानुसार घेण्यात यावे. इतर इतिवृत्त कायम करावे.

मा. सभापती : आताच स. सदस्या डॉ. बिनवडे यांनी सूचना केल्यानूसार दोन विषय वगळून बाकीचे इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते. हे दोन्ही विषय नियमानूसार विषय पत्रिकेवर घेण्यात यावे.

**संवाद :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक **24/11/2006** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतवृत्तामधील विषय क्र.169 व 170 वगळता उर्वरीत इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. विषय क्र.169 व 170 नियमानुसार पुन्हा विषयपत्रिकेवर घेण्यात यावेत.

**विषय क्र.189 : (दि. 16.12.06 च्या बैठकीतील निर्णयानुसार - स्था.स.सभेतील विषय क्र.176)**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे गारखेडा येथील सर्व्हे नंबर 6 व 9 येथील अंतिम मंजूर रेखांकन नामे रोशन को.ऑप. हौसिंग सोसायटी मधील भूखंड क्रमांक 42 चे मिळकतधारक यांनी विनंती केली होती की, त्यांचा सदरील भूखंड हा सिडको हद्दीतील विकास योजना नकाशातील 30 मीटर रूंदीचा रस्ता विचारात घेऊन रेखांकनास मंजुरी देण्यात आली होती.

तथापी येथे या रेखांकनातील भूखंड क्रमांक 39 ते 42 च्या बाजुने मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची इमारत व संरक्षित भिंत बांधल्याने सदरील विकास योजना रस्ता रद्द झाला असून, या कारणाने त्यांचे भूखंडात सद्य:स्थितीत पुरेशा रूंदीचा म्हणजे 25 फुट रस्ता उपलब्ध होत नाही. सदरील अडचण ही लगत भूखंड क्रमांक 39, 40 साठीही होती. परंतु या भूखंडावर एकत्रितरित्या बांधकाम परवानगी घेऊन इमारत व कुंपण भिंत बांधण्यात आल्याने या भूखंडासाठी पोच रस्त्याची समस्या आजमितीस राहिलेली नाही.

या कारणाने त्यांनी याच रेखांकनातील भूखंड क्रमांक 23 च्या लगत असलेली खुली जागा जिचे क्षेत्र 858.00 चौ.मी. आहे त्यातून त्यांचे पूर्वीचे भूखंड क्रमांक 42 चे समतुल्य क्षेत्र म्हणजेच 666.00 चौ.मी. भूखंड स्वरूपात देण्यात यावा व त्यांचा भूखंड क्रमांक 42 व 41 च्या मागील बाजुच्या खुल्या जागेत समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

स्थळ पाहणीत सदरील भूखंड धारकाची अडचण योग्य आढळून आल्याने त्यांचे विनंतीनुसार व सिडको विकास योजनेत 30.00 मीटर रूंद रस्ता वगळण्यात आल्याने त्यांची होत असलेली गैरसोय विचारात घेण्यात आली असून, त्यास विकास नियंत्रण नियमावलीतील कलम 6.6 खाली हार्डशिप अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

संबंधीताने भूखंड क्रमांक 42 च्या मागील खुल्या जागेचे क्षेत्र 1240.00 चौ.मी. त्यातून भूखंड क्रमांक 42 चा समावेश केल्यास खुल्या जागेचे क्षेत्र 1906 चौ.मी. होऊन भविष्यात सार्वजनिक उद्देशासाठी कामी येवू शकेल. तथापी उक्त नमुद प्रमाणे भूखंड धारकांची झालेली संबंधीताची विनंती मान्य करण्यास हरकत नसावी असे प्रशासनाचे मत आहे. त्यास्तव मा.स्थायी समितीने सदर प्रस्तावास मंजुरी द्यावी अशी विनंती आहे.

उक्त नमुद प्रमाणे खुल्या जागेत भूखंड प्रदान करण्यात येवून संबंधीतांना भूखंड रेखांकनातील खुल्या जागेत समाविष्ट करणेस सदर रेखांकनातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था नामे रोशन को.ऑप.हौसिंग सोसायटी औरंगाबाद यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त असून सदर भूखंड अदलाबदल करणेसाठी येणारा दुरूस्त नोंदणीकृत दस्तऐवजाचा खर्च संबंधीत भूखंडधारक यांनी करावयाचा आहे.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.हिम्मतराव दाभाडे : या प्रस्तावात शेवटी दिले की ४२ व ४१ च्या मागील बाजूच्या खूल्या जगेत समाविष्ट करण्यात यावा ती जगा महापालिकेची की खाजगी आहे.

सहा. संचालक(न.र.):त्यावेळेस ती जगा सिडकोची होती. आता हायकोर्टाची संरक्षित भिंत झालेली आहे.

श्री.मधुकर सावंत : मी प्रत्यक्ष जगेवर पाहणी केलेली आहे मंजूरी देण्यात यावी.

मा. सभापती :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा येथील सर्व्हे नंबर 6 व 9 येथील अंतिम मंजूर रेखांकन नामे रोशन को.ऑप. हौसिंग सोसायटी मधील भूखंड क्रमांक 42 चे मिळकतधारक यांनी विनंती केल्यानुसार, या रेखांकनातील भूखंड क्रमांक 39 ते 42 च्या बाजुने मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची इमारत व संरक्षित भिंत बांधल्याने सदरील विकास योजना रस्ता रद्द झाल्याने याच रेखांकनातील भूखंड क्रमांक 23 च्या लगत असलेल्या 858.00 चौ.मी. खुल्या जागेतून, त्यांचे पूर्वीचे भूखंड क्रमांक 42 चे समतुल्य क्षेत्र म्हणजेच 666.00 चौ.मी. भूखंड स्वरूपात देण्यास आणि त्यांचा भूखंड क्रमांक 42 व 41 च्या मागील बाजुच्या खुल्या जागेत समाविष्ट करण्यास, सदर भूखंड अदलाबदल करणेसाठी येणारा दुरूस्त नोंदणीकृत दस्तऐवजाचा खर्च संबंधीत भूखंडधारक यांनी करावा या अटीवर भूखंड अदलाबदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.190 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रथम नगराध्यक्ष कै.द्वारकादासजी पटेल यांच्या गुलमंडी येथील अर्धाकृती पुतळ्याऐवजी नुकताच पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आलेला आहे. सदर पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी यापुर्वी अस्तित्वात असलेला अर्धाकृती पुतळा काढण्यात आलेला आहे. सदर अर्धाकृती पुतळा कै.द्वारकादासजी पटेल यांच्या कुटुंबियांनी सदर अर्धाकृती पुतळ्याची देखभाल व निगा राखण्याकरीता त्यांच्याकडे देण्यात यावा अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.

सदर अर्धाकृती पुतळा कै.द्वारकादासजी पटेल यांच्या कुटुंबियांकडे दिल्यास पुतळ्याची व्यवस्थित निगा राहू शकेल. यासाठी पुतळा सदर कुटुंबियांकडे हस्तांतरीत करणेबाबत मा.आयुक्तांनी शिफारस करून स्थायी समितीची मंजुरी घेणे बाबत आदेशित केलेले आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रथम नगराध्यक्ष कै.द्वारकादासजी पटेल पूर्णाकृती पुतळा गुलमंडी येथे उभारताना काढयात आलेला, यापुर्वी तेथे अस्तित्वात असलेला अर्धाकृती पुतळा कै.द्वारकादासजी पटेल यांच्या कुटुंबियांकडे दिल्यास पुतळ्याची व्यवस्थित निगा राहू शकेल. यासाठी काढण्यात आलेला अर्धाकृती पुतळा सदर कुटुंबियांकडे हस्तांतरीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.191 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.51 इंदिरानगर स्लम अंतर्गत काँक्रीट रस्ता बांधणी करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.16,75,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात स्लम विभागात नवीन काँक्रीट रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी र.रू.16,75,000/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

सौ. लता दलाल : यापूर्वी रस्त्याचे काम केंव्हा झाले होते. जे ई कोण होते. कोणत्या ठैकेदाराने केले. किती खर्च झालेला होता. त्या रस्त्याची लेन्थ किती होती. याची सभागृहाला माहिती देण्यात यावा.

मा. सभापती : या बाबतीत पूढील बैठकीत सर्व माहिती सादर करण्यात यावी.या पूढे असे प्रस्तावाच्या संदर्भात सर्व माहिती सोबत दिली जवी.मंजूरी देण्यात येते. विषय क्र १९१,१९२ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.51 इंदिरानगर स्लम अंतर्गत काँक्रीट रस्ता बांधणी करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.16,75,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.192 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.26 गणेशनगर जवळील 12 मीटर रूंदीच्या मुख्य रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार र.रू.19,62,300/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी रक्कम रू.19,62,300/- च्या अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26 गणेशनगर जवळील 12 मीटर रूंदीच्या मुख्य रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,62,300/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.193 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.26 अंतर्गत विविध स्वयंविकसित गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार र.रू.15,93,600/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी सदरील स्वयं विकसित संस्थेकडून नगर रचना विभागाच्या प्रचलित दरानुसार विकास शुल्क जमा करून घेणेच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास शिफारस केली आहे. तरी रक्कम रू.15,93,600/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मो.जवेद मो.इसाक : या कामासाठी बजेट मध्ये तरतूद आहे काय पान नंबर सहित खूलासा करावा.

मा. आयुक्त : यापूर्वी या संस्था स्वत: सर्व सुविधा करून घेत असे. त्यांचेकडून बांधकाम परवानगी देतांना विकास शुल्क आकारले गेले नाही. आता ते सूविधा करीत नाही म्हणून तेथे सुविधा द्यायच्या असेल तर विकास शुल्क आकारावे किंवा नाही असा प्रस्ताव आहे.

मा. सभापती : या संस्थाकडून विकास शूल्क घ्यावे किंवा नाही म्हणून हे धोरणात्मक निर्णय आहे. सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावे.अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते.

अति.शहर अभियंता : सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात पान क्र डब्ल्यू १६७ अ.क्र. २ नूसार २० लक्षची तरतूद आहे. त्याचे अंतर्गत हे प्रस्तावित केलेले आहे तरीसुध्दा सेल्फ डेव्हलपमेंन्टची कॉल्नी असल्याने नगररचना ठरवेल त्या प्रमाणे कार्यवाही होईल.

मा. सभापती : या प्रस्तावात असे नमूद केले आहे की, प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी सदरील स्वयं विकसित संस्थेकडून नगर रचना विभागाच्या प्रचलित दरानुसार विकास शुल्क जमा करून घेणेच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास शिफारस केली आहे. हे पॉलीसी मॅटर असल्याने या संदर्भात आगामी सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव निर्णयास्तव ठेवण्यात यावा. प्रस्तावातील अट वगळून या कामासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रभाग क्र.26 अंतर्गत विविध स्वयंविकसित गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.15,93,600/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या अटीसंबंधी निर्णय घेण्याकरीता आगामी सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.194 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मयुरपार्क व सुजाता हौसिंग सोसायटी, एकता हौ.सोसायटी अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,99,250/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे.

तरी रक्कम रू.14,99,250/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मयुरपार्क व सुजाता हौसिंग सोसायटी, एकता हौ.सोसायटी अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,99,250/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.195 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या निविदा विभागाचे संगणकीकरण झालेले असून, सध्या 'ई' निविदा विभाग कार्यरत आहे. सदरचेकाम हे मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि., पुणे या संस्थेस बांधा-वापरा-हस्तांतरीत करा(BOT) तत्वावर दिलेले आहे. निविदा विभाग कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने निविदा प्रक्रियेमध्ये खालील सुधारणा करणे आवश्यक आहे.

1. सार्वजनिक बांधकाम खाते, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पाटबंधारे विभाग, एम.आय.डी.सी., सिडको इत्यादी मुळ खात्यांच्या पंजीकृत कंत्राटदारांना महानगरपालिकेमध्ये नाव नोंदणी (Enrolment) बंधनकारक राहील.
2. नांव नोंदणी (Enrolment) चा विहीत कालावधी (Validity) एक वर्ष राहील.
3. कंत्राटदारास प्रतयेक वर्षी नांव नोंदणीसाठी रूपये 1000/- शुल्क औरंगाबाद महानगरपालिकेस द्यावे लागेल. त्यापैकी रूपये 600/- महानगरपालिकेस मिळतील व उर्वरीत रक्कम रूपये 400/- बी.ओ.टी. अभिकर्त्यास मिळतील.
4. बी.ओ.टी.अभिकर्त्यामार्फत खालील कामे करण्यात येतील.
   अ) मुळ खात्यांच्या पंजीकृत कंत्राटदारांचे प्रमाणपत्र तपासून महानगरपालिकेमध्ये नांव नोंदणी करून घेणे.
   ब) प्रत्येक कंत्राटदाराने केलेल्या कामांची सविस्तर माहिती ठेवणे व वेळोवेळी महानगरपालिकेस कळविणे.
   क) नांव नोंदणी झालेल्या प्रत्येक कंत्राटदारास ओळखपत्र Bidders Identity Card, Users name and Password देणे, जेणे करून कंत्राटदार इंटरनेटवरून निविदा घेणे व निविदा दाखल करणे ही कार्यवाही करू शकतील.

ड) प्रत्येक वर्षी नांव नोंदणी नुतनीकरण करणे. नांव नोंदणी व नुतनीकरणाचा कालावधी प्रत्येक वर्षी 1 जानेवारी ते 20 जानेवारी पर्यंत राहील.

5. कंत्राटदारास त्याच्या नोंणी किंमतीच्या फक्त चार पट रक्कमेची कामे करण्याची मुभा राहील. उदा.एखाद्या कंत्राटदाराची नोंदणी रूपये 'अ' ची असेल तर त्यास महानगरपालिकेत वर्षभरामध्ये फक्त 'अ' च्या चार पट किंमतीच्या कामांची निविदा घेता येतील.

करीता उपरोक्त प्रमाणे सुधारणा/कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री. मुधकर सावंत : प्रत्येक वेळेस बीओटीचा एक ना एक विषय असतो. सर्वे करण्यासाठीही बीओटीवर दिले जते. महानगरपालिकेच्या माध्यमातून घ्यावे.

मा. आयुक्त : बीओटीचे प्रपोजल नाही. ऑलरेडी २००६ ला मंजूर केलेले आहे. नवीन कोणतीही एजन्सीची मागणी करीत नाही. पूर्वी जी ई. टेंडरींग एजन्सी आहे आपल्या मान्यतेने काम सूरू केलेले आहे. दुसरे असे की रिंग पध्दत बंद होणे गरजेचे आहे. इंटरनेटवर टेंडर सूरू केले तर ज्यांना ऑलरेडी दिले आहे इन्टरनेट वेब साईट मॅनेज करायचे आहे. विना पैसे देता हे एक्स्ट्रा काम देत आहोत. पूर्वी मंजूर केलेले आहे त्यास जस्तीचे काम देत आहोत.

श्री. रविकांत गवळी :३१ मार्च २००६ मध्ये ई. टेंडरींग साठी पुणे येथील एजन्सी नियुक्त केली. त्यात अटी दिल्या होत्या. प्रत्येक टेंडर मागे १५० ते २०० रूपये वसूल करतो व टेंडर दिले जते व सादर करून घेण्याचे काम करीत आहे. इतर जी कामे आहे ती सर्व महानगरपालिकेच्या माध्यमातून केली जतात. अटी नुसार अंमलबजवणी होते काय?

कार्य. अभियंता (पापू) : यामध्ये टेंडरचे बुकलेट तयार करणे शेड्यूल बी तयार करणे, हे सर्व कामे एजन्सी करते एक प्रत महानगरपालिकेला तयार करून द्यावी लागते. त्यानंतर त्याचे झेरॉक्स काढले जते. हे सर्व कामे त्यांना करून द्यावे लागतात. महापालिकेने करायचे झाल्यास जे वेब साईट आहे त्यासाठी सॉप्टवेअर इंजिनिअर लागेल. इंनटरनेट बँकेतून घ्यावे लागेल. गेट वे लागतो. वेब साईटवरून डेबीट कार्ड, एटीएम कार्ड वरून टेंडर खरेदी करता येईल. टेंडरची किंमत व निविदेची किंमत संबधीत डायरेक्ट तो लेखा विभागात जमा करू शकेल. फक्त एन्डोलमेन्ट करीत आहोत आपल्याकडे लिस्ट राहिल.

मा. आयुक्त : यामुळे महानगरपालिकेवर कोणताही आर्थीक बोज पडणार नाही उलट पैसे मिळणार आहे. जे एन्डोलमेन्ट करणार त्यांचेकडून प्रत्येकाचे १००० रू. घेणार.६०० रू. महापालिका घेणार व ४०० रू. संबधीत एजन्सीला देणार आहे. एन्डोल केल्यानंतर प्रत्येक ठेकेदारास इंटरनेट कार्ड देणार आहोत. यात कुणालाही कळणार नाही किती विक्री केले. कुणी किती टेंडर व कुणाचे आले हे कुणालाही कळणार नाही. बँकेचा गेट वे असतो त्यांचे मार्फत पेमेन्ट करायचे.

डॉ. आशा बिनवडे : महानगरपालिकेच्या वतीने का करण्यात येवू नये.

मा. आयुक्त : महापालिकेने केल्यास कमीत कमी १.५० लक्ष पगारापोटी जतील. ४०,०००रू. होत आहे. हे पाच वर्षासाठी राहणार आहे. हा विषय समजून घ्यावा नंतरच मान्य करावा.

श्री.संजय सिरसाट : ई.एम.डी. बँकेत न भरता लेखा विभागात भरणा करावी. जेणे करून त्या पावतीवर घेणाराचे नाव कामाचे नाव व रक्कम लिहिली जते. आजपासून डायरेक्ट ई.एम.डी. लेखा विभागाकडे द्यावी. त्याची अमलबजवणी करावी.

मा. सभापती : याची त्वरीत अंमलबजवणी करावी. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या निविदा विभागाचे संगणकीकरण 'ई' निविदा विभागाचे काम हे मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि., पुणे या संस्थेस बांधा-वापरा-हस्तांतरीत करा(BOT) तत्वावर दिलेले असून, निविदा विभाग कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने निविदा प्रक्रियेमध्ये प्रस्तावात अ.क्र.1 ते 5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास व त्याची अंमलबजावणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.196 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, निपट निरंजन परिसरात श्री.गोविंद हुंबे यांच्या घरासमोरील जागेत उद्यान विकसीत करणे करीता सा.बां.विभागाची दरसूची सन 2005-06 नुसार रक्कम रूपये 2,49,600/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. प्रभाग समिती, प्रभाग-अ यांच्या मान्यतेनंतर सदर कामासाठी निविदा सूचना वर्तमानपत्रात प्रसिध्दी करून निविदा मागविण्यात येऊन सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा 21.02% कमी दर भरलेले कंत्राटदार मे.मोना कन्स्ट्रक्शन यांना कार्यालयीन औपचारीकता पुर्ण करून जा.क्र.205/06 दि.2.6.2006 अन्वये कार्यादेश देण्यात आले होते. तथापी कामाच्या प्रत्यक्ष ठिकाणी जागेची अडचण व नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन सदर काम रद्द करून त्याऐवजी बेगमपुरा विद्युत कॉलनी येथील बॉस्केट बॉल ग्राऊंडवर ट्रिमीक्स फ्लोरींग करणे करीता स.सदस्य यांनी मागणी केली आहे. त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला असून, निपटनिरंजन परिसरात श्री.गोविंद हुंबे यांच्या घरासमोरील जागेत उद्यान विकसीत करणे या कामाऐवजी बेगमपुरा विद्युत कॉलनी येथील बॉस्केट बॉल ग्राऊंडवर ट्रिमीक्स फ्लोरींग करण्यास दि.15.12.2006 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.624 अन्वये मान्यता दिलेली आहे.

प्रस्तावित कामातील बाबींमध्ये पुर्णतः बदल होत असून, कामाचे स्वरूप पूर्णपणे वेगळे आहे. त्यामुळे कामाचे मुळ कंत्राटदार मे.मोना कन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांचे प्राप्त मुळ दराऐवजी बेगमपुरा विद्युत कॉलनी येथील बॉस्केट बॉल ग्राऊंडवर ट्रिमीक्स फ्लोरींग करणे हे काम अंदाजपत्रकीय दराने करून घेणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस मा.आयुक्तांनी केली आहे.

तरी निपटनिरंजन परिसरात श्री.गोविंद हुंबे यांच्या घरासमोरील जागेत उद्यान विकसीत करणे या कामाऐवजी बेगमपुरा विद्युत कॉलनी येथील बॉस्केट बॉल ग्राऊंडवर ट्रिमीक्स फ्लोरींग करणेचे काम मे.मोना कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामाच्या प्रत्यक्ष ठिकाणी जागेची अडचण व नागरिकांच्या समस्या लक्षात घेता, निपट निरंजन परिसरात श्री.गोविंद हुंबे यांच्या घरासमोरील जागेत उद्यान विकसीत करणेचे काम रद्द करून त्याऐवजी र.रू.2,49,600/- च्या अंदाजपत्रकीय खर्चाचे काम, वर नमूद कामाचे मुळ कंत्राटदार मे.मोना कन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांचे प्राप्त मुळ दराऐवजी बेगमपुरा विद्युत कॉलनी येथील बॉस्केट बॉल ग्राऊंडवर ट्रिमीक्स फ्लोरींग करण्याचे काम अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.197 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.19 रायगडनगर एन-9 म्हाडा कॉलनी येथे उद्यान विकसीत करण्याकरीता सा.बां.विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.10,48,650/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केल्यानुसार मा.स्थायी समिती सभा दि.16.8.2006 च्या सभेत ठराव क्र.73 अन्वये र.रू.4,99,876/- चे वाढीव कामास मान्यता मिळालेली आहे. सदरील ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्याची मागणी स.सदस्यांनी केलेली आहे.

त्यानुसार सदरील वाढीव कामास्तव रक्कम रूपये 2,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचे एकुण अंदाजपत्रक रूपये 17,48,526/- चे मान्यतेस्तव मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करण्याची शिफारस केली आहे. सदरील कामाचा वाढीव खर्च रक्कम रू.2,00,000/- मा.सर्वसाधारण सभेने दि.27.10.2006 रोजी ठराव क्र.577 अन्वये मान्यता दिल्यानुसार वळती कमरण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.

सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये 15,48,526/- + 2,00,000/- असे एकूण रू.17,48,526/- व वाढीव काम मुळ ठेकेदाराकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.19 रायगडनगर एन-9 म्हाडा कॉलनी येथे उद्यान विकसीत करण्याकरीता मंजूर कामाचे ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्याचे वाढीव कामास्तव रक्कम रूपये 2,00,000/- चा खर्च येत असल्याने, या कामासाठी रक्कम रूपये 15,48,526/- + 2,00,000/- असे एकूण रू.17,48,526/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम मुळ ठेकेदार यांचेकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.198 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, होनाजीनगर जटवाडा रोड येथील खुली जागा विकसीत करण्याचे रक्कम रू.99,415/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून सदरील कामासाठी आर्थिक तरतुद अर्थसंकल्प सन 2006-07 नुसार पा.क्र. W56 अ.क्र.5 ‘नवीन उद्याने’ या लेखाशिर्षका अंतर्गत घेण्यात आली आहे.

सदरील खुल्या जागेतील पडलेली संरक्षित भिंत बांधणे व खड्डा बुजविण्याचे काम त्वरीत करण्याबाबत स.सदस्य यांनी मागणी केलेली असून सदर काम त्वरीत करणे गरजेचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री.खुर्शीद हसन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने काम सुरू करून घेण्यास मा.शहर अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे.

करीता उपरोक्त रक्कम रूपये 99,415/- चे काम अंदाजपत्रकीय दराने गुत्तेदार श्री.खुर्शीद हसन यांच्याकडून करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे होनाजीनगर जटवाडा रोड येथील खुल्या जागेतील पडलेली संरक्षित भिंत बांधणे व खड्डा बुजविण्याचे काम त्वरीत करणे गरजेचे असल्याने रक्कम रूपये 99,415/- चे काम अंदाजपत्रकीय दराने उपलब्ध गुत्तेदार श्री.खुर्शीद हसन यांच्याकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.199 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झाशीची राणी लक्ष्मीबाई उद्यानात विविध कामे करणेस्तव वास्तुविशारद श्री.समिल असोसिएटस् यांचेकडून सदरील कामास्तव नकाशे व अंदाजपत्रक व श्री.खोत पाटील असोसिएटस् यांचेकडून या जागेचा कंटूर नकाशे घेण्याचे प्रस्तावित आहे. सदरील कामास्तव त्यांना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% फिस देण्यात येईल. मा.आयुक्तांनी प्रकरण मा.स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील काम वास्तुविशारद श्री.समिल असोसिएटस् व श्री.खोत पाटील असोसिएटस् यांचेकडून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| सौ.लता दलाल | : खाजगी व्यक्तीचे नाव आलेले आहे. नगररचना विभाग ही हे काम करू शकतात. फिस देण्याची गरजनाही. महानगरपालिकेकडे पॅनल आहे त्यांचेकडून हे काम करून घेण्यात यावे. |
| कार्य. अभि.(विद्यु.ड्रे.) | : महापालिकेकडे आर्कीटेट नाही. लॅण्ड स्केपींगचे संपूर्ण काम आहे. पॅनल करतो आहोत. |
| मा. सभापती. | : मागिल स्थायी समितीच्या सूचनेनूसार अशा प्रकारचे प्रस्तावात आर्कीटेंक्ट पॅनल तयार करावे. एका ऑर्कीटेक्ट कडून डिजईन न घेता तीन लोकांकडून घेण्यात यावे. ज्याची डिजईन मंजूर होईल त्यांनाच फिस देण्यात यावी. मंजूरी देण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झाशीची राणी लक्ष्मीबाई उद्यानात विविध कामे करणेस्तव वास्तुविशारद श्री.समिल असोसिएटस् यांचेकडून सदरील कामास्तव नकाशे व अंदाजपत्रक व श्री.खोत पाटील असोसिएटस् यांचेकडून या जागेचा कंटूर नकाशे तयार करून घेण्यास तसेच सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.200 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत प्रत्यक्ष रंगमंचावरील पडदे नवीन बसविण्याकरीता बाजारातून या क्षेत्रा अंतर्गत काम करणाऱ्या संस्थाकडून दरपत्रके मागविण्यात आली असून, न्युनतम दरपत्रक मे.सजावट हँडलूम या संस्थेचे आहे. त्यानुसार नवीन पडदे बसविण्याकरीता रक्कम रूपये 1,89,800/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.546 दि.27.10.2006 अन्वये मान्यता दिल्यानुसार वळती तरतूद रक्कम रूपये 5.00 लक्ष मधून सदरील कामाचा खर्च करण्यात येईल.

त्यानुसार सदरील कामाचा खर्च रक्कम रूपये 1,89,800/- व सदरील काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये मे.सजावट हँडलूम यांचेकडून करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| डॉ. आशा बिनवडे | : अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करावी. |
| मा. सभापती | : शॉर्ट टेंडर नोटीस काढून कार्यवाही करावी. |

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रकरणी शॉर्ट टेंडर नोटीस (अल्प मुदतीची निविदा) काढून पुढील आवश्यक कार्यवाही करावी, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.201 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेचे संत एकनाथ रंगमंदिर या नाट्यगृहाचे नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. नुतनीकरणाची विविध कामे प्रगतीपथावर आहेत. या नाट्यगृहामध्ये पुर्वीचीच आसन व्यवस्था आहे. याबाबत नाट्यकर्मी व या क्षेत्रातील जाणकारांनी खुर्च्या नव्याने बसवून आसन व्यवस्थाही सुधारीत करणेबाबत सूचना केली आहे. ज्यामुळे भविष्यामध्ये आसन व्यवस्था बदलण्यासाठी पुन्हा नाट्यगृह बंद ठेवावे लागणार नाही. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 22.25 लक्षचे तयार करण्यात आले असून मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.324 दि.11.8.2006 अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापी आसन व्यवस्थाही चांगल्या दर्जाची अद्ययावत करण्यास्तव सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये 24.99 लक्षचे तयार करण्यात येऊन मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आलेले आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन फेर निविदा सूचना क्र.61/06 दि.22.11.2006 अन्वये निविदा मागविल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या नियोजीत तारखेस 02 दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. पेन वर्कर्स | 4.8% जास्त दराने |
| 2. | एम.एस.एस.आय.डी.सी. | 38% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.8% जास्त दराची निविदा मे.पेन वर्कर्स यांची आहे. त्यानुसार मे.पेन वर्कर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.8% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. आशा बिनवडे : पहिले टेंडर झाले ते किती रक्कमेचे होते. तेथील आसनव्यवस्था स्पेसीफिकेशन कसे होते याचा खुलासा करावा.

कार्य.अभि.(विद्यु. व ड्रे) :२२.२५ लक्षचे काम होते. तीन प्रकारच्या खुर्ची होत्या. ३६००, २५००, १७५० असे तीन दर होते. टेंडर कॉल केले होते. सॅम्पल आले होते. पूर्वीच्या खुर्च्याची प्रत चांगली नव्हती.

डॉ. आशा बिनवडे : पूर्वी तीन प्रकारच्या खूर्च्या होत्या आता दोन प्रकारच्या बसविणार आहोत पूर्ण ऑडीटोरीयम करणार आहोत. नाटयगृह ऑडीटरीयम आणि चित्रपटगृह या दोन्ही मधील फरक यांना कळालेला नाही. चित्रपटगृहात ज्शा खुर्च्या असाव्यात तशाच या नाट्यगृहात असाव्यात असे अपेक्षीत धरून आधीच्या टेंडर मध्ये आसन व्यवस्था ही वेगळी होती. आता आसनव्यवस्था ही वेगळी आहे. नाट्यगृहाची आसन व्यवस्था ही विशिष्ट प्रकारची असते. प्रत्येक खुर्चीवरून जे कार्यक्रम चालतो तो व्यवस्थीत दिसला पाहिजे अशी व्यवस्था असावी. इंजिनिअरीग कॉलेज्ला या बाबत माहिती घेतली असती तर आसनव्यवस्था कशा पध्दतीने असावयास पाहिजे हे कळाले असते. प्रसिध्द रंगकर्मी श्री. प्रशांतजे दामले यांना हेच अपेक्षीत होते की त्या नाट्यगृहामध्ये चालणारा परफॉर्मन्स हा बसून सर्वांना बघता आला पाहिजे त्यानुसार हे टेंडर व्हायला पाहिजेहोते. तसे झाले नाही. अडीच लक्षचा खर्चही वाढतो आहे. हे रद्द

करावे. आधीच्या टेंडर प्रमाणे टेक्नीकली इजिंनिअरीग विभागाकडे ओपनीयन मागवून लेखी अभिप्राय घ्यावा. त्यानंतरच टेंडर काढावे. आसन व्यवस्था ही योग्य त्या पध्दतीनेच असावयास पाहिजेअसा आग्रह आपला असला पाहिजे इतर ठिकाणी आसन व्यवस्था कशी आहे त्या पध्दतीने असावेत.

मा. आयुक्त : यामध्ये त्यांनी असे सांगीतले होते पुशपॅक असू नये. नाशिक, पुणे मुंबई येथे नाट्यगृह आहे तेथे बघून येण्यास संबधीत अधिकारी यांना माहिती घेण्यास सांगितले आहे, दोन दिवसात माहिती येईल.

श्री.संजय सिरसाट : मा. आयुक्तांनी खुर्ची पसंत करावी. शॉटटेंडर काढायचे असेल तर ते काढावे. येणारे टेंडर व असलेली खूर्ची हे कम्पायर केल्याशिवाय मान्य करू नये नसता कारण उद्या हेच दर वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. १२ ते १५ टक्केनी जस्त दर आले तर आणि ती खूर्ची सिमीलर असेल तर जे अतिरिक्त खर्च आहे तो महापालिकेवर येईल. त्यास स्थायी समिती जबाबदार असेल.

डॉ. आशा बिनवडे : अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करावी.

मा. सभापती : या विषयाच्या बाबतीत तांत्रिक दृष्टया योग्य तो निर्णय घ्यावा. या बाबतीत त्वरीत शॉटटेंडर करावे व यात स्पेसिफिकेशनचा उल्लेख असावा यात महापालिकेचे आर्थिक नूकसान न होता हे काम त्वरीत सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर या नाट्यगृहाचे नुतनीकरणाचे कामांमतर्गत नाट्यगृहामध्ये नव्याने खुर्च्या बसवून आसन व्यवस्था सुधारीत करणेच्या कामासाठी त्वरीत शॉर्ट टेंडर (अल्प मुदतीची निविदा) करावे. यात स्पेसिफिकेशनचा उल्लेख असावा तसेच काम त्वरीत सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.202 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.3 एस.बी.ओ. शाळेजवळ खुल्या जागेवर बॅडमिंटन हॉल बांधणे व खेळाचे मैदान तयार करून जॉगींग ट्रॅक व संरक्षीत भिंत बांधणे करीता सा.बां. विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रूपये 22,40,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.511 दि.13.10.2006 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.53/06 दि.1.11.2006 अन्वये निविदा मागविल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 14 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या नियोजीत तारखेस 07 दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | 2.18% कमी दराने |
| 2. | मे. अमन असोसिएटस् | 0.5% कमी दराने |
| 3. | मे.एस.एम.इब्राहीम | 9.89% जास्त दराने |
| 4. | मे.जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | 20% जास्त दराने |
| 5. | मे.शहा कन्स्ट्रक्शन | 16% जास्त दराने |
| 6. | मे.मेट्रो कन्स्ट्रक्शन | 18% जास्त दराने |
| 7. | मे. एल.के.कन्स्ट्रक्शन | 11.80% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.18% कमी दराची निविदा मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची आहे. त्यानुसार मे.रत्नगुरू कनस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.18% कमी दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

सौ. लता दलाल : ही जगा महानगरपालिकेची आहे काय.

कार्य.अभि.(विद्यु.व ड्रे): महानगरपालिकेच्या मालकीची जगा आहे. तेथे संरक्षित भिंत बांधलेली आहे. सिडकोकडून महानगरपालिकेकडे ती जगा आलेली आहे. ९६ जगा दिल्या त्यात ही जगा आहे.

मा. सभापती : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.3 एस.बी.ओ. शाळेजवळ खुल्या जागेवर बॅडमिंटन हॉल बांधणे व खेळाचे मैदान तयार करून जॉगींग ट्रॅक व संरक्षीत भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 2.18% कमी दराची मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.203 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका वॉर्ड अ, ब, क, ड, ई आणि फ अंतर्गत रू.10 हजार पर्यंत मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मिळकत धारकांना वॉर्ड ऑफीसर यांचेकडून नोटीस देण्यासाठी अशा नोटीसेस संगणकाद्वारे प्रिंट करून देण्याची तयारी मे.सारंग एंटरप्रायजेस, उल्कानगरी, औरंगाबाद या संस्थेने दर्शविलेली आहे. सदरील नोटीसेसमुळे वॉर्ड ऑफीसर यांना मालमत्ता कराची थकबाकी वसुली करणे सोईचे होईल. पर्यायाने महापालिका उत्पन्नात वाढ होईल. तरी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मे.सारंग एंटरप्रायजेस यांना वॉर्ड अ, ब, क, ड, ई आणि फ अंतर्गत ज्या मालमत्ता धारकांकडे रूपये 10 हजार पर्यंत थकबाकी आहे अशा मालमत्ता धारकांची नोटीसेस प्रिंट करण्याचे काम देणे योग्य राहील.

अटी व शर्ती :

1. सदर नोटीसेस वॉर्ड कार्यालय निहाय आणि मोहल्ला निहाय पुस्तक स्वरूपात, परफोरेशनसह एक + एक स्वरूपात पुरविण्यात याव्यात.
2. संबंधीत संस्थेने प्रथमतः वॉर्ड अ, ब, क आणि ई या वॉर्डाच्या अंतर्गत असलेल्या नोटीसेस तयार करून दहा दिवसांत आत वॉर्ड ऑफीसर यांना द्याव्यात. उर्वरीत वॉर्ड ड आणि फ या वॉर्ड अंतर्गत असलेल्या नोटीसेस संगणकीकरण पूर्ण झाल्यावर तात्काळ देण्यांत याव्यात.
3. सदर नोटीस प्रिंट करण्यासाठी या कार्यालयाकडून संबंधीत संस्थेस कागद व संगणक साहित्य पुरविले जाणार नाही.
4. या नोटीसेस प्रिंट करण्यासाठी प्रती नोटीस रू.पाच या दराने संबंधीत संस्थेस मावेजा देण्यात येईल. सर्व वॉर्ड कार्यालयांना नोटीसेस प्रिंट करून पुरविल्यानंतर संबंधीत संस्थेस मावेजा देण्यात येईल.
5. देय रक्कमेवर नियमानुसार सेवाकर मनपाने द्यावेत.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मो.जवेद मो.इसाक: हे काम देण्याची गरजनाही. महानगरपालिकेचे कर्मचारी करू शकतात. रद्द करावे.

सौ.लता दलाल : हा प्रस्ताव रद्द करावा.

मा. सभापती : सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.204 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.58 अंतर्गत लक्ष्मण चावडी ते कैलासनगर स्मशानभूमी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.13,60,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व स्थायी समितीसमोर सादर करण्याचे आदेशित केले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.13,60,000/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.58 अंतर्गत लक्ष्मणचावडी ते कैलासनगर स्मशानभूमी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.13,60,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.205 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.42 या भागातील नागरीकांना जाण्या येण्यासाठी रस्ता नाही ते लोक रिटेनींग वॉलच्या टॉपवरून ये जा करतात. यामध्ये कधीही अपघात होऊन पादचारी नाल्यात पडू शकतात त्यामुळे करीम कॉलनी ते म्हाडा कॉलनी पर्यंत मनपाच्या नाल्यातील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व त्यावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2004-05 च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.10,51,118/- आहे. सदरील काम सन 2006-07 च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान क्र.W-39 अ.क्र.16 वरील 10.00 लक्ष व पान क्र.W-159 वर शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अ.क्र.04 रविंद्रनगर येथे गटार दुरूस्त करणे या कामाचे 5.00 लक्ष तरतुदी मधून रू.60.00 हजार वळती करून असे एकूण नाला ट्रेनिंग या लेखा शिर्ष अंतर्गत रू.10,51,118/- रूपये च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.16.12.2006 रोजी शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.10,51,118/- चे अंदराजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री. संजय सिरसाट : या प्रस्तावाबाबत माहिती द्यावी.

कार्य.अभि.(विद्यु.ड्रे.) : नागरीकांना ये ज करण्यासाठी रस्ता नाही.

मा. सभापती : **मंजूर.**

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.42 या भागातील नागरीकांना जाण्या येण्यासाठी रस्ता उपलब्ध व्हावा यासाठी करीम कॉलनी ते म्हाडा कॉलनी पर्यंत मनपाच्या नाल्यातील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व त्यावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.10,51,118/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.206 :**

उप आयुक्त (महसूल) प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेचे मो.गुलमंडी येथील भोलेश्वर मार्केटचा पहिला मजला भाडेतत्वावर देणे बाबत खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.

**मोहल्ला गुलमंडी(मनपा व्यापारी संकुल) भोलेश्वर मार्केटचा पहिला मजला :**

प्रस्तावित भोलेश्वर मार्केटचा पहिला मजल्याचे भाडे रू.75/- प्रति चौ.मी. प्रतिमाह व अनामत रक्कम रू.350/-प्रती चौ.मी. आकारण्यात यावे.

करीता वरील सर्व जागेकरीता जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो भाडेकरून भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रतिमाह भरावा लागेल. नेहमीच्या अटी शर्ती नुसार भाड्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय सिरसाट : भाडे तत्तवावर देण्याचा प्रस्ताव आहे संबधीत अधिकारी सभागृहात नाही.

मा. सभापती : **हा विषय स्थगित ठेवण्यात येतो.** उपआयुक्त महसूल जेंव्हा सभागृहात राहतील त्यावेळी घेण्यात येईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार उप आयुक्त (महसूल) सभागृहात अनुपस्थित असल्यामुळेसदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.207 :**

उप आयुक्त (महसूल) प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेचे मो.स्वानंदनगर येथील महानगरपालिका मालकीचा बहुउद्देशीय हॉल लिजवर देणे बाबतचे दराबाबत खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.

**मो.स्वानंदनगर बहुउद्देशीय हॉल भाडेतत्वावर देणे बाबत :**

महानगरपालिका औरंगाबाद तर्फे स्वानंदनगर येथे बांधण्यात आलेल्या बहुउद्देशीय हॉल ज्याचे क्षेत्रफळ 72.20 चौ.मी. आहे. त्याची स्वानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेने भाडेतत्वावर मागणी केल्यानुसार हॉलचे भाडे रक्कम रू.5848/- प्रती माह आकारणी व अनामत रक्कम रू.1,06,134/- भरून घेण्यास भाडे समितीची तसेच मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे. तरी नेहमीच्या अटी शर्ती नुसार भाड्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. आशा बिनवडे : या प्रस्तावात हॉलसाठी जेभाडे आकारले आहेत व अनामत रक्कम दिलेली आहे एवढी मोठी रक्कम कुठलीही स्वयसेवी संस्था देवू शकणार नाही असे माझे मत आहे. व असे हॉल तसेच पडून राहतील गेल्या चार पाच वर्षापासून मी विषय मांडत आहे, की माझ्या प्रभागामध्ये एक व्यायामशाळा गेल्या दहा वर्षापासून बाधंलेली आहे. आणि ती माजे आमदाराच्या ताब्यात आहे. त्यांनी त्यास कुलूप लावलेले आहे अजूनही महानगरपालिकेने ते ताब्यात घेतलेले नाही. त्या व्यायामशाळेला तारकुंपणही त्यांचेच आहे व ही व्यायामशाळा माझीच आहे व ती माझीच संस्था वापरेल असे ते म्हणतात. आपल्या ताब्यात ती व्यायामशाळा का घेतली जत नाही.

मा. सभापती : आजच्या आज सदरील व्यायामशाळा ताब्यात घेण्यासंबधी कार्यवाही करावी. कूलूप काढावे.

श्री.संजय सिरसाट : आपण रूलींग दिली परंतू यासंबधी मा.आयुक्ताचे मत काय आहे, कार्यवाही आज होणार की नाही. कूलूप तोडली जईल, दुसरी लावली जईल. पून्हा संचिका पूटअप होईल सहा. संचालक यांचा अभिप्राय घेतला जईल.

डॉ. आशा बिनवडे : या विषयाच्या अनुषंगाने जेभाडे ठेवलेले आहे ते एवढे न लावता रिजनेबल भाडे लावावे तसेच अनामन रक्कमही एवढी घेण्यात येवू नये जेकी अनेक हॉल व इतर इमारती तशाच पडून आहे. जेनूकसान होईल ते त्याचा खर्च भरून घेता येईल एवढीच असावी.

श्री.संजय सिरसाट : अनेक सदस्यांनी म्हटले की अशा अनेक इमारतीमध्ये अवैध धंदे चालतात. पत्त्याचा क्लब होता. जर सेवाभावी संस्था चांगली असेल तर त्यांना अशा हॉल, इमारती नाममात्र दराने भाड्याने द्यावे. आणि विद्युत खर्च त्या संस्थेकडून घ्यावा. देखभाल दुरूस्तीमधे रंगरगोटी संबधीत संस्थेनेच केली पाहिजे काच फुटली तरी ती त्यांनीच दुरूस्त केली पाहिजे नाममात्र भाडे १०००रू. आकारावे परंतू ती जगा ती त्या त्या सोसायटीतील लोकांना वापरता आली पाहिजे

डॉ. आशा बिनवडे : त्या कॉलनीच्या रहिवाशांकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. तेथील लोकांना आधी प्राधान्य दिले पाहिजे

मा.आयुक्त : सभागृहाला जे निर्णय घ्यायचा आहे तो घ्यावा. परंतू एकच विनंती आहे की असे हॉल इमारती बांधून तसेच पडून राहतात याची आपल्याला पण कल्पना आहे म्हणून कृपा करून विनंती की यावर्षी बजेटमध्ये नवीन एकही इमारत, व्यायामशाळा करण्यात येवू नये. महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होवू नये म्हणून जे खर्च होतो त्या पोटी किती भाडे मिळावयास पाहिजे याचाही विचार झाला पाहिजे ८० टक्के इमारती खालीच असतात.

डॉ. आशा बिनवडे : फक्त उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीने त्याकडे बघू नये. सामाजिक कामासाठी हॉल बांधलेले आहेत. हे सुध्दा पाहिले पाहिजे वापरही झाला पाहिजेव देखभाल दुरूस्तीही झाली पाहिजे या दृष्टीने कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : सभागृहानेच निर्णय घ्यावा परंतू जर ८०% इमारतीचा वापर हा सामाजिक कामासाठी होत नसेल बांधल्यानंतर पडून राहत असेल तर नव्याने इमारती, हॉल बाधंण्याबाबत विचार करावा.

श्री. संजय सिरसाट : अटी शर्ती ज्या लावतो एक वर्ष असेल दोन वर्ष असेल, जरी भाड्याने दिला नाही तरी तेथील लाईट व इतर देखभाल दुरूस्तीचा खर्च महापालिकेला करावा लागतो. हा जे बोज महापालिकेवर पडतो. जर संस्थेला भाड्याने द्यायचे असेल तर अटी-शर्ती मोठया कठीण आहेत. ते इतके भाडे, अनामत रक्कम भरू शकत नाही.

मा. आयुक्त : ५० टक्के डिपॉजेट करण्यास हरकत नाही.

श्री.मधुकरसावंत : हा विषय माझ्या प्रभागातील आहे. या भागातील बरेचशे नागरीक हे स्वातंत्र्य सैनिक आहेत. त्यांचे मोठे योगदान आहे. जे भाड्याची मागणी केली आहे ते न घेता फक्त १०००/- रूपये आकारण्यात यावे. एक लाख रूपये डिपॉजेट दर्शविलेले आहे. ती सेवाभावी संस्था आहे. लाईटचा खर्च घ्यावा तसेच एक हजर रूपये नाममात्र भाडे घेण्यात यावे. जे सर्व्हीस चार्जेस आहे एक टक्केनी म्हणजे एक हजर रूपयाच्या बॉण्डवर नोटरी करून घ्यावे सर्वीस चार्जलागणार नाही. अशा पध्दतीने मंजूर करावा.

मा.सभापती : सर्वच सदस्यांनी आपले मत मांडलेले आहे. जेहॉल भाडे तत्त्वावर द्यायचे आहेत. त्या संदर्भाने हे भाडे परवडण्यासारखे नाही. रूपये १,०००/- प्रमाणे ह्या हॉलचे भाडे घेवून संबधीत संस्थाना किंवा व्यक्तीना द्यावेत. तसेच त्या त्या भागातील नागरीकाची व नगरसेवकांची एनओसी असणे गरजेचे आहे. डीपॉजीटची रक्कम म्हणजे १२ महिण्याचे भाडे म्हणजे १२,०००/- रू. घेण्यात यावे. लाईट बील तसेच देखभाल दुरूस्तीचा खर्च संबधीत व्यक्तीने / संस्थेने करावा. जे लिगल करारनामा करतो ते कागदपत्र रजिष्टर्ड करण्याची गरज नाही ते नोटरी करून घ्यावे. जेणे करून खर्च हा कमीत कमी होईल व हॉलचाही वापर होईल. अशा पध्दतीने हॉल दिले तर वापर होवू शकेल. या मागचा उद्देश हा आहे की नागरीकांना सुखसोयी मिळाव्या. याचा अर्थ महानगरपालिकेने नवीन हॉल करू नये असा नाही. नागरीकाच्या गरजेनूसार हॉल करण्याची गरज आहे. परंतू त्याचा वापर अटी शर्ती शिथील केल्या तरच होवू शकतो, याचा प्रशासनाने विचार करून आताच सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार करारनामा करून संबधीत संस्थांना किंवा व्यक्तीला हे हॉल देण्यात यावे. नोटरी करून घ्यावे एक हजर ऐवजी दोन हजरचा बॉण्डवर करून घेण्यात यावे. जर संबधीत संस्थेने किंवा त्या व्यक्तीने हॉल किंवा इमारतीचा वापर अटी शर्तीनूसार केला नाही तर त्या संबधी कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना असतील. मनपाच्या मालकीचे असलेले शहरातील सर्व रिकामे हॉल, इमारती अशा पध्दतीने नाममात्र भाड्याने देण्याकरीता एकत्रित प्रस्ताव मालमत्ता विभागाने आगामी स्थायी समिती सभेपुढे सादर करावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिका औरंगाबाद तर्फे स्वानंदनगर येथे बांधण्यात आलेल्या बहुउद्देशीय हॉल, स्वानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेने भाडेतत्वावर मागणी केल्यानुसार खालील दर्शविलेल्या अटी-शर्तीस अधीन राहून नाममात्र भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्याचप्रमाणे हॉलसाठी मासिक भाडे नाममात्र रू.1000/- आकारण्यात यावे.

1. अनामत रक्कम 12 महिन्याचे भाडे म्हणजेच रू.12000/- आकारण्यात यावे.
2. लाईट बील, देखभाल दुरूस्तीचा खर्च संबंधीत व्यक्ती/संस्थेने करावा.
3. करारनामा रजिष्टर्ड करण्याऐवजी नोटरी करण्यात यावे जेणे करून खर्च कमी येऊन संबंधीत संस्था/व्यक्तीवर आर्थिक बोजा पडणार नाही.
4. महानगरपालिकेच्या मालकीच्या शहरातील रिकामे असलेले हॉल, इमारती याच तत्वानुसार म्हणजे अटी-शर्ती शिथील करून भाड्याने देण्याची कार्यवाही करावी व तसा प्रस्ताव आगामी स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.208 :</u>**

उप आयुक्त (महसूल) प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेचे मो.चिकलठाणा येथील भाजी मार्केट मधील 10 गाळे भाडेतत्वावर देणे बाबत खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.

**मो.चिकलठाणा भाजी मार्केटचे एकूण 10 गाळे :**

प्रस्तावित रिक्त भाजी मंडीतील गाळ्याकरीता प्रती गाळा भाडे रक्कम रू.500/- प्रती माह व अनामत रक्कम रू.10,000/- आकारण्याची मान्यता भाडे समिती तसेच मा.आयुक्त यांनी दिलेली आहे.

करीता वरील गाळ्या करीता जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो भाडेकरूस भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रतिमाह भरावा लागेल. नेहमीच्या अटी शर्ती नुसार भाड्याने देणे योग्य. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.साहेबराव कावडे : रू. पति. महा भाडे ५०० दिलेले आहे ते ३००रू करण्यात यावे. तसेच अनामत रक्कम ही १० हजर दिलेली आहे ५ हजर करण्यात यावे. गरीब लोक आहे.

मा. सभापती : नियमानुसार हे भाडे व डिपॉजेट जेवढे कमी करणे शक्य होत असेल तेवढे कमी करण्यात यावे. **हा विषय मंजूर करण्यात येत आहे.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील भाजी मार्केटचे 10 गाळे भाडे तत्वावर देण्याकरीता प्रस्तावित रिक्त भाजी मंडीतील गाळ्याकरीता प्रती गाळा भाडे रक्कम रू.500/- प्रती माह व अनामत रक्कम रू.10,000/- आकारण्यास तसेच वरील गाळ्या करीता जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो भाडेकरूस भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रतिमाह भरावा लागेल या व नेहमीच्या अटी शर्ती नुसार भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सभागृहातील चर्चेनुसार नियमानुसार प्रस्तावित भाडे व अनामत जेवढे कमी करणे शक्य होत असेल तेवढे कमी करण्यात यावे असेही ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.209 :**

उप आयुक्त(महसूल) प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेचे मो.एकनाथनगर येथील व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्वावर देणे बाबत खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.

मो.एकनाथनगर येथील व्यापारी संकुल(दुकान क्र.8, 16 व 28):- जा.क्र.मनपा/मामअ/2006/712, दि.19-6-2006 अन्वये प्रसिध्द केलेल्या जाहीर प्रगटना नुसार मो.एकनाथनगर महानगरपालिका व्यापारी संकुलातील रिक्त दुकाने 8, 16 व 28 करीता भाडेतत्वावर घेणे करीता अर्ज प्राप्त झाले होते. त्यामध्ये छाननी करून प्रथम तीन अर्ज खालील प्रमाणे प्राप्त झाले आहेत. प्रथम तीन अर्ज विचारात घेऊन खालील प्रमाणे दुकानांचे वाटप करणे योग्य.

1. सिध्दार्थ विश्वनाथ सोनवणे — दुकान क्र. 8
2. महंमद नसिम शे. कासीम — दुकान क्र.16
3. अलका रतन गवळे — दुकान क्र.28

सदर दुकानांचे भाडे प्रती दुकान रू.300/- प्रती महा व अनामत रक्कम रू.7500/- इतके आकारणे योग्य.

करीता वरील सर्व जागेकरीता जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो भाडेकरूने भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरावा लागेल. नेहमीच्या अटी शर्तीनुसार भाड्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.एकनाथनगर येथील व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्वावर देण्याकरीता सिध्दार्थ विश्वनाथ सोनवणे दुकान क्र. 8, महंमद नसिम शे. कासीम दुकान क्र.16 व अलका रतन गवळे दुकान क्र.28 साठी दुकानांचे भाडे प्रती दुकान रू.300/- प्रती महा व अनामत रक्कम रू.7500/- इतके आकरणी करून, नियमाप्रमाणे जागेचा मालमत्ता कर भाडेकरूने भाड्याच्या व्यतिरिक्त

भरावा लागेल व सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह या व इतर अटींसह देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.210 :**

मा.स्थायी समितीचे निर्देशानुसार मा.आयुक्त व भाडे समितीच्या मंजुरीनुसार उप आयुक्त(महसूल) प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेचे मो.चिकलठाणा येथील महानगरपालिकेचे व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्वावर देणे बाबत खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.

**मो.चिकलठाणा येथील महानगरपालिकेचे नविन व्यापारी संकुल मधील दुकान क्र.1 व 2 चे भाड्यात सुधारणा बाबत :**

मा.स्थायी समिती सभा कार्यक्रम पत्रिका क्र.6 दि.28-6-2006 ठराव क्र.40 नुसार मा.सभापती, स्थायी समिती यांनी दिलेल्या निर्णयानुसार मो.चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीमधील गाळे/दुकाने दोन वर्षापुर्वी भाड्याने दिले. त्यांना भाडे जास्त आहे व ते सर्वांना समान भाडे आकारण्यात यावे. तरी श्री.सुभाष सर्जेराव गाजरे दुकान क्र.1, श्री.रामनाथ शंकरराव गाजरे यांनी दि.24-3-2006 रोजी अर्ज देऊन विनंती केली की, त्यांनी मागील वर्षी सदर दुकान निविदा पध्दतीने घेतले आहे. त्याची अनामत रक्कम रू.70,000/- भरणा केली आहे व त्याचे वार्षिक भाडे रू.24,252/- असे आहे.

दुकान क्र.2 श्री.रामनाथ शंकरराव गाजरे यांनी दि.24-3-2006 रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की, त्यांनी मागील वर्षी सदर दुकान निविदा पध्दतीने घेतले आहे. त्याची अनामत रक्कम रू.70,000/- व दुकानाचे वार्षिक भाडे रू.21,012/- असे आहे. परंतु सद्यःस्थितीत महानगरपालिकेने उर्वरीत दुकानांचे भाडे व अनामत रक्कम कमी करून दिले आहे. ते याप्रमाणे, अनामत रक्कम रू.20,625/- व भाडे रू.784/- प्रती माह असे आहे. त्याप्रमाणे आम्हाला अनामत रक्कम रू.20,625/- व भाडे रू.784/- प्रती माह असे आकारण्यात यावे व जास्तीची भरलेली अनामत रक्कम परत करण्यात यावी, असे अर्जदाराने लेखी कळविले आहे. जा.क्र.मनपा/मामअ/630/2006, दि.10-3-2006 रोजी प्रसिध्द जाहीरात अन्वये मो.चिकलठाणा महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीतील व्यापारी संकुलातील गाळे/दुकाने जाहीर बोली मध्ये दुकान क्र.7 साठी सर्वात जास्तीची बोली रक्कम रू.1450/- प्रती माह भाडे करीता श्री.निसार खान मंजुर खान यांनी बोलली आहे.

तरी मा.सभापती, स्थायी समिती सभा दि.28-2-2006 ठराव क्र.40 (का.प.क्र.6) नुसार सदर ठिकाणी सर्वांना समान भाडे आकारणे असा निर्णय दिल्यामुळे दुकान क्र.1 व 2 चे भाडे रक्कम रू.1450/- प्रती माह, वार्षिक भाडे रू.17,400/- व अनामत रक्कम रू.20,625/- इतके आकारणे योग्य व उर्वरीत अनामत रक्कम संबंधीतास परत देणे योग्य.

करीता वरील सर्व जागेकरीता जागेचा मालमता कर जो नियमाप्रमाणे येईल तो भाडेकरूस भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरावा लागेल. नेहमीच्या अटी शर्तीनुसार भाड्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.चिकलठाणा येथील महानगरपालिकेचे नविन व्यापारी संकुल मधील दुकान क्र.1 व 2 चे भाड्यात सुधारणा करण्याचे दृष्टीने, स्थायी समिती सभा दि.28-2-2006 ठराव क्र.40 (का.प.क्र.6) नुसार सदर ठिकाणी सर्वांना समान भाडे आकारणे असा निर्णय झाल्यानुसार दुकान क्र.1 व 2 चे भाडे रक्कम रू.1450/- प्रती माह, वार्षिक भाडे रू.17,400/- व अनामत रक्कम रू.20,625/- इतके आकारणे आकारण्यास तसेच उर्वरीत अनामत रक्कम संबंधीतास परत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.211 :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री.अमरसिंग जगनसिंग ठाकूर, कनिष्ठ लिपिक, नगर सचिव विभाग यांना झालेल्या रक्ताच्या कर्करोगाच्या (Blood Cancer) उपचारासाठी कार्यालयातर्फे त्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2004/451 दि.31-3-2004 रोजी अग्रीम रू.75,000/- व जा.क्र. मनपा/आस्था-1/595/2004 दि.6-5-2004 अन्वये अग्रीम रू.25,000/- मंजूर करण्यात आलेले आहे. संबंधीतास देण्यात आलेले एकत्रित अग्रीम रू.1,00,000/- (अक्षरी एक लक्ष मात्र) चे समायोजन संबंधीताने यापुर्वीच दाखल केले आहे. त्यांना कार्यालयाने दि.6-5-2004 ते दि.11-1-2005 पर्यंत वैद्यकीय खर्च परतावा पोटी रू.2,47,559/- अदा केले आहेत. त्यामुळे संबंधीताला दि.6-5-2004 ते दि.11-1-2005 या तारखेपर्यंत एकत्रित अदा करण्यात आलेल्या वैद्यकीय परिपूर्ती रक्कम रू.3,47,559/- यास कार्योत्तर मंजुरी देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.अमरसिंग जगनसिंग ठाकूर, कनिष्ठ लिपिक, नगर सचिव विभाग यांना झालेल्या रक्ताच्या कर्करोगाच्या (Blood Cancer) उपचारासाठी कार्यालयातर्फे दि.6-5-2004 ते दि.11-1-2005 या तारखेपर्यंत एकत्रित अदा करण्यात आलेल्या, अग्रीम रक्कमेच्या समायोजनासह वैद्यकीय परिपूर्ती रक्कम रू.3,47,559/- यास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घेषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद